आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range...
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

Elite banquet
A.C. बँक्वेट हॉल
अहिल्यानगर मध्ये पहिल्यांदा ए.सी. बँक्वेट हॉल,
भव्य हॉल व प्रशस्त पार्किंग
* वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस
* शुभकार्य, साखरपुडा
* डोहाळे जेवण, मुंज
* नामकरण समारंभ
* कॉर्पोरेट इव्हेंट्स
व इ. कार्यक्रमासाठी उपलब्ध
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वतिक चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9422222020

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १४.०७.२०२५ | अंक नं. ९० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी
खरेदीवर पॉईंट
पॉईंटसवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
+ 15%* पर्यंत सूट
Conditions Apply*

# महापालिकेच्या हलगर्जीमुळे रस्त्यांवर कचऱ्यांचे ढिग; शहरात सर्वत्र दुर्गंधी, नागरिक त्रस्त, आरोग्य धोक्यात

नगर - अहिल्यानगर महानगरपालिकेच्या कचरा संकलन व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाला असून शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना घरातील कचरा दिवसेंदिवस साठवून ठेवावा लागत आहे. कचरा उचलला जात नसल्याने रस्त्यांवर मोठमोठे कचऱ्याचे ढीग साचले असून त्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी व अस्वच्छता निर्माण झाली आहे. ही परिस्थिती नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण करणारी ठरत आहे.

महापालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी पाईपलाईन रोड व पद्मानगर परिसराची पाहणी केली. मात्र पाहणी दरम्यान नागरिकांनी थेट आयुक्तांना सवाल करत त्यांच्यासमोर आपल्या व्यथा मांडल्या. विशेषतः महिलांनी 'आयुक्त साहेब, कचरा टाकू तरी कुठे'? असा सवाल केला. या परिसरात अनेक दिवसांपासून कचरा उचलला जात नसल्यामुळे अस्वच्छता, मोकाट कुत्र्यांचा त्रास, डासांचे प्रमाण आणि

## कचरा टाकू कुठे? महिलांचा आयुक्तांना सवाल

दुर्गंधी यामध्ये वाढ झाली आहे. याचा परिणाम लहान मुले, वृद्ध आणि आजारी व्यक्ती यांच्या आरोग्यावर होत आहे.

महापालिकेकडून कचऱ्याच्या संदर्भात कुठल्याही सुविधा मिळत नसल्याने तीन महिन्यांपासूनचा कचरा संकलन कर महापालिकेने घेऊ नये, असे आवाहन माजी नगरसेवक निखिल वारे यांनी नुकतेच केले होते. महापालिकेने स्वच्छतेसंबंधी ठोस पावले उचलावीत व दररोज नागरिकांच्या घरोघरी जाऊन घंटागाडीद्वारे कचऱ्याचे संकलन करावे. प्रशासनाने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन, कचरा संकलन व विल्हेवाट व्यवस्था तातडीने पूर्ववत करावी, अशी मागणी आयुक्त डांगे यांच्याकडे केली आहे.

कचरा संकलन व्यवस्थेतील अडचणींची आम्ही गंभीर दखल घेतली आहे. सध्या कार्यरत असलेल्या कचरा संकलन एजन्सीच्या कार्यक्षमतेबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर, ही एजन्सी हटवून नव्या एजन्सीकडे कचरा संकलनाची जबाबदारी सोपवली जाईल, असे आयुक्त यशवंत डांगे यांनी सांगितले. नवीन एजन्सीसोबत कामकाजाचा आराखडा अंतिम टप्प्यात असून, लवकरच शहरात नियमित, वेळेवर आणि यंत्रबद्ध कचरा संकलन सुरु होईल. नागरिकांना अस्वच्छतेमुळे होणारा त्रास थांबवणे आणि स्वच्छ शहर निर्माण करणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. यामध्ये कोणतीही ढिलाई खपवून घेतली जाणार नाही. नागरिकांनी प्रशासनावर विश्वास ठेवावा, आम्ही लवकरच समाधानकारक बदल करून दाखवू, असे आश्वासन यशवंत डांगे यांनी दिले.

(छायाचित्र पान २ वर)

आपला माणुस, आपला चहा...
रत्नकमल चहा™
ब्रँडेड कंपनीचा चहा व रत्नकमल चहा
एक वेळेस जरूर तुलना करून पहा
आशिष ट्रेडर्स चहा पावडरचे ठोक व किरकोळ विक्रेते
रत्नकमल, बुरुड गल्ली, मारुती मंदिरासमोर,
अहिल्यानगर- ४१४००१
Contact : 8767369367

ए.एच. पोखरणा ज्वेलर्सच्या दोन्ही शोरुमसाठी
पाहिजेत
A.H. पोखरणा ज्वेलर्स
• अकौंटट जागा 2
• सेल्समन जागा 10
• सेल्सगर्ल जागा 10
इच्छुक उमेदवारांनी अर्जासह समक्ष खालील पत्यावर भेटावे.
कृष्णरत्न टॉवर, सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अहिल्यानगर

पाहिजेत
अहिल्यानगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका ज्वेलर्सच्या अहिल्यानगर शाखेसाठी हवे आहेत.
मॅनेजर जागा 1 (M) — पदवीधर व तत्सम पदावर किमान ५ वर्षे काम केल्याचा अनुभव आवश्यक
कॅशियर जागा 2 (M) — बँक, पतसंस्था येथे कॅशियर म्हणुन काम केल्यास प्राधान्य. टॅली सॉफ्टवेअरचे ज्ञान आवश्यक
सेल्समन जागा 5 (M/F) — तत्सम पदावर काम केल्याचा किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक
हेल्पर जागा 2 (M/F) — 10वी / 12वी पास / नापास
अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स
- सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी -
वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512

प.पू. आनंदऋषीजी म.सा.
वाढदिवस
एक सत्वशील चारित्र्याचा..
प्रेरणादायी व्यक्तीमत्वाचा...



शैक्षणिक, व्यावसायिक व सामाजिक क्षेत्रात, अमुल्य योगदान देणारे आमचे मार्गदर्शक व जैन समाजाचे भूषण
मा. सीए रमेशजी कनकमलजी फिरोदिया
विश्वस्त व उपाध्यक्ष - * पांजरापोळ गोरक्षण संस्था विश्वस्त - रमेश फिरोदिया एज्युकेशनल ट्रस्ट, मुंबई
* मातोश्री वृध्दाश्रम, नाशिक * महावीर एज्युकेशनल वसतीगृह, मुंबई
* आत्मा आनंद संघ, मुंबई * धार्मिक परिक्षा बोर्ड, अहिल्यानगर * जैन कॉन्फरन्स, दिल्ली
श्री रुपमुनी रजत सेवा समिती, पाली राजस्थान * आदेश्वर पार्श्व सेवा ट्रस्ट, चित्तोडगड
चेअरमन - रमेश फिरोदिया आर्ट सायन्स सिनिअर कॉलेज, साकुर, ता. संगमनेर * रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अ.नगर
समाजभूषण सन्मान - * स्व. सुवालालजी वाकेकर (बीड) पुरस्कार
जीवनगौरव पुरस्कार - जीतो, अ.नगर
सीए असोसिएशन, श्री आनंदऋषिजी हॉस्पिटल, अ.नगर * भक्तनिवास, अ.नगर * कैवल्यधाम कोल्हार येथे भरीव सहकार्य.
आपल्या वाढदिवसानिमित्त
आनंदी दिर्घायुष्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !
14 July
पोपटलालजी रतनचंदजी चंगेडिया
किरण, संजय
चंगेडिया परिवार
नवरंग ग्रुप, सोनई
श्रीमती चंचलबाई शांतीलालजी चंगेडिया
देवेंद्र, राजेश, हरिष, अभय, ललित
चंगेडिया परिवार
यश ग्रुप, सोनई
प्रितेशजी प्रदिपजी गुगळे
गुगळे परिवार
पी.पी. कन्स्ट्रक्शन, अहिल्यानगर
design : Yashwant

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

बाथरूम शॉवर व बॉडी जेटच प्रेशर कमी झालं आहे?
आता ही समस्यानाही सतावणार..
आजच घरी आणा प्रेशर बूस्टर पंप
ABHAY SALES
CORPORATION & HARDWARE
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd,
Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011

१६ वे पुण्यस्मरण



स्व. ॲड. निरंजनसिंग के. पंजाबी
स्व. दि. १४/७/२००९
आठवण तुमची प्रत्येक क्षणाला, व्याकुळ करते आमच्या मनाला..
आज जरी नाही तुम्ही आमच्यात,
सदैव राहतील तुमच्या आठवणी आमच्या मनात..
आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली
* दुःखांकित *
सौ. अनिता पंजाबी नगरसेविका, मनपा, अ.नगर
जसपाल पंजाबी मा. उपनगराध्यक्ष
ॲड. गुरुविंदर पंजाबी (नात)
गुरुबक्ष पंजाबी (नातू)

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# १० दिवस उलटूनही सारसनगरमधील चोरीचा तपास नाही

## तपास लावण्यासाठी पोलीस उपाधीक्षकांकडे नागरिकांची निवेदनाद्वारे मागणी

नगर - सारसनगर भागातील रहिवासी केवल गांधी यांच्या घरी चोरी करत मोठा ऐवज लंपास झाला होता. यात सोन्याचे नाणे, रोख रक्कम चोरीस गेली होती. दहा दिवस झाले तरी पोलिसांकडून कुठलाही तपास लागलेला नाही, त्यामुळे परिसरातील नागरिक भयभीत झाले आहे. नागरिकच सुरक्षित नाही. पोलिसांचा चोरट्यांवर वचक नसल्यानेच चोरीचे सत्र सुरु आहे. या चोरीचे सीसीटीव्ही फुटेजदेखील आहे. या चोरीचा तपास तातडीने लावावा, अशी मागणी सारसनगर येथील नागरिकांनी शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी माजी नगरसेवक प्रकाश भागानगरे, माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले, माजी नगरसेवक संजय चोपडा, विपुल शेटिया, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्याध्यक्ष अभिजीत खोसे, केवल गांधी, दिनेश भंडारी, संतोष पिपाडा, राजेश गांधी, निलेश पोखरणा, गौतम शिंगी आदी उपस्थित होते.


चोरीचा तपास तातडीने लावावा अशी मागणी सारसनगर परिसरातील नागरिकांनी शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. (छाया - लहू दळवी)

निवेदनात म्हटले आहे की, सारसनगर परिसरात चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे २४ ते ३० लाख रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना घडून १० दिवसांचा कालावधी उलटूनही गुन्ह्याचा तपास लागलेला नाही. या प्रकरणात कार्यवाही न झाल्याने पीडित आणि स्थानिक नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

केवलकुमार गांधी यांनी दिलेल्या माहितीनुसार घरी कोणी नसताना चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप तोडून प्रवेश करत कपाट फोडून त्यातील सोने, चांदीचे दागिने, रोख रक्कम आणि इतर मौल्यवान वस्तू चोरल्या. यावेळी घर मालकाने चोरट्यांना जिन्यावरून जाताना पाहिले होते, मात्र चोरी आणि प्रत्यक्षदर्शी अनुभवामुळे ते घाबरले आणि लगेचच पोलिसांना कळवण्यात आले. पोलिसांनी गुन्हा नोंदवला असला तरी त्यावेळी चोरी झालेल्या ऐवजाची संपूर्ण माहिती पीडित परगावाहून आल्यानंतरच देऊ शकले. तपासाची गती अत्यंत संथ असून, उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करूनही कारवाई झालेली नसल्याने प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणाची पुनर्तपासणी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

### एक होती व्हिडीओकॉन...

नगर कर्मभूमी मानून १९८५-८६ मध्ये स्व. नंदलाल धूत यांनी आपल्या ३ मुलांना सोबत घेऊन व्हिडीओकॉन या तत्कालीन प्रसिद्ध टि.व्ही. उत्पादन कंपनीची स्थापना केली होती. याचे मुख्य कार्यक्षेत्र उत्पादन आपल्या नगरीसह नजीकच्या संभाजीनगर येथे होते.



बहुदा देशात प्रथमच रंगीत टिव्हीचे उत्पादन सुरू करुन त्यांनी टिव्ही क्षेत्रात जणू क्रांतीच केली होती. गरीब, मध्यमवर्गीय ग्राहकांना १० ते २०% कमी दराने टिव्ही देवून त्यांनी बाजारपेठचा मोठा हिस्सा काबीज केला होता.

योगायोगाने त्या वेळेस 'सेल्को टिव्ही' नावाने नगरच्याच सारडा परिवारातल्या मदनगेपाल सारडा (देवकरणशेठ यांचे चिरंजीव) यांनी मोठी कंपनी चालू केली होती.

व्हिडीओकॉनने देशभरात १७ ठिकाणी उत्पादन युनिटस् वाढवून विस्तृत वितरणाची जाळे तयार केले होते. योग्य मार्केटिंग व प्रसिद्धी केली होती. त्यामुळे नगरच्या बाजारपेठेतील व्यापाऱ्यांपासून दिवाणजीपर्यंत आणि श्रीमंतापासून सामान्यांपर्यंत अनेकांनी शेअर बाजारात हाजारो, लाखो कमावले होते. नंतर हळूहळू टिव्ही, फ्रिज, वॉशींग मशीन, एसी इ. उत्पादनांनी अधिक यश मिळवले. एक ब्रँड झाला.

२००७ मध्ये कंपनीने तेल, गॅस, दूरसंचार क्षेत्रात प्रवेश केला अन् दुर्दैवाने त्यांची घसरण सुरू झाली. २००८ च्या जागतिक मंदीने दुष्काळात तेरावा महिना आणला. वाढत्या कर्ज बोज्याने कंपनी मोठ्या नुकसानीत जाऊ लागली.

काळानुरुप अपडेशन नसल्याने घोटाळे सारख्या आरोपांनी अधिकच तोटा झाला. १९९० मध्ये रंगीत टिव्ही बाजारपेठेचा २५% हिस्सा असलेली कंपनी २०२० पर्यंत सुमारे ९० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक कर्जांनी जवळपास डुबली. नंतर २०२१ मध्ये वेदांता समूहाच्या टिवन स्टारने ३००० कोटी रुपयांना विकत घेतली. संस्थापक नंदलालजी धूत यांनी अनेक धार्मिक तीर्थक्षेत्री व संस्थांना सहकार्य दिले होते.

तर अशी होती एक नगरीची कंपनी... व्हिडीओकॉन... होती एकेकाळी अभिमान...

# मावा कारखान्यावर छापा, १ कोटी १ लाखांचा गुटखा जप्त; १४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

नगर - राज्यात प्रतिबंधित असलेला मावा मटका तयार करुन विकणाऱ्या कारखान्यावर पोलीस अधीक्षक यांच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत १३ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील एक कोटी एक लाख ७४ हजार ७५० रुपये किमतीच्या मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई अकोले तालुक्याचे कोतूळ येथील केळी रोडवर १३ जुलै रोजी केली.


मावा मटका तयार करुन विकणाऱ्या कारखान्यावर पोलीस अधीक्षक यांच्या पथकाने छापा टाकला. या कारवाईत १२ जणांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडील १ कोटी १ लाख ७४ हजार ७५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

मिळालेल्या माहितीवरुन पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे यांच्या पथकाने अकोले तालुक्यातील कोतुळ येथील केळी रोडवरील पत्र्याच्या शेडमध्ये सुरु असलेल्या कारखान्यावर छापा टाकला. या कारवाईत १२० पोती हिरा पानमसाला व रॉयल ७१७ तंबाखू, ५ वाहने व रोख रक्कम असा १ कोटी १ लाख ७४ हजार ७५० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या कारवाईत शोएब शाविद काझी, शाहिद हुसेन लतीफ पटेल, मतीन शब्बीर शेख, जुबेर युनूस शेख, (सर्व रा. कोतुळ, ता. अकोले), शहानवाज जावेद काझी, परवेज युनूस शेख, (रा.कोतुळ, ता. अकोले), साद अन्वर तांबोळी (कासार गल्ली, अकोले), आतिक अन्वर शेख रा. समशेरपुर घोडसरवाडी ता. अकोले), शाहरुख जावेद काझी (रा.कोतुळ अकोले), सादिक इसानउल्ला पठाण, अमोल शरद जाधव, (दोघे रा. काझीपुरा, अकोले) इम्रान रौफ शेख (कोतुळ ता. अकोले) यांना ताब्यात घेतले. हा माल कोठून आणला असे विचारले असता त्यांनी हा माल शेख नूर रऊफ, आतिक उर्फ डॉन मोहम्मद शेख (दोघे रा. भिंगार) यांचे कडून घेतला असल्याचे सांगितले. पोलिसांनी दोघांचा भिंगार येथे शोध घेतला असता पोलिसांना शेख नूर अब्दुल हा मिळून आला तर आतिक उर्फ डॉन शेख हा पसार झाला.

या प्रकरणी अकोले पोलीस ठाण्यात १४ जणांविरुद्ध भारतीय दंड विधान तसेच अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००३ अंतर्गत गुन्हा दाखल केला. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर अधीक्षक सोमनाथ वाकचौरे, उपविभागीय अधिकारी कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक संतोष खाडे व त्यांच्या विशेष पथकातील पोलीस अधिकारी राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार शंकर चौधरी, अजय साठे, मल्लिकार्जुन बनकर, अरविंद भिंगारदिवे, उमेश खेडकर, सुनिल पवार, दिनेश मोरे, अमोल कांबळे यांनी केली आहे.


आयुक्त यशवंत डांगे यांच्यासमोर कचरा समस्या मांडताना महिला नागरीक. (छाया - लहू दळवी)

# रामेश्वर मंदिरातील दानपेटीतून चोरी

नगर - नगर तालुक्यातील गुंडेगाव येथील ऐतिहासिक रामेश्वर मंदिराच्या सभामंडपातून चोरट्याने दानपेटी फोडून ६ हजार रुपयाची रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. हा प्रकार ९ जुलैच्या रात्री ८ वाजल्यापासून १० जुलैच्या सकाळी ७ दरम्यान घडली.

मंदिर परिसरामध्ये कोणतीही सुरक्षा व्यवस्था नसल्याने ही चोरी झाली असल्याचा स्थानिकांनी आरोप केला आहे.

या प्रकरणी गणेश बाबासाहेब हराळ (वय ४५, रा. गुंडेगाव) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम ३०३(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार थोरात हे करीत आहेत.

## संशयितरित्या फिरणारा गजाआड

नगर - शहरात मध्यरात्री संशयास्पदरित्या भिंतीच्या आडोशाला लपून हालचाली करणाऱ्या बिरजा उर्फ बिरजू राजू जाधव (वय २८ रा. कोठी मकासरे चाळ, पाटील हॉस्पिटल पाठीमागे, अ.नगर) यास कोतवाली पोलिसांनी ताब्यात घेतले. ही कारवाई १३ जुलै रोजी मध्यरात्री १२.१५ वाजण्याच्या सुमारास स्टेशन रोडवरील क्लेरा ब्रुस ग्राउंडजवळ केली.

कोतवाली पोलीस शहर हद्दीत रात्र गस्त घालीत असताना स्टेशन रोडवरील क्लेरा ब्रुस ग्राउंड जवळ भिंतीच्या आडोशाला एक इसम भिंतीच्या आडोशाला लपून अंधाराचा फायदा घेत स्वतःचे अस्तित्व लपवून काहीतरी गुन्हा करण्याच्या तयारीत बसलेला असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांना त्याचा संशय आल्याने पोलीस त्याच्याकडे जात असताना पोलिसांना पाहताच तो पळू लागला. पोलिसांनी त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेतले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पो. कॉ.महेश पवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बिरजा उर्फ बिरजू जाधव याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १२२ अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास महिला पोलीस नाईक वर्षा पंडीत या करत आहेत.

## रात्रीच्या वेळी संशयास्पदरित्या फिरणाऱ्या २ जणांना पकडले

नगर - मध्यरात्रीच्या सुमारास दोन संशयितास तोफखाना पोलिसांनी दोन वेगवेगळ्या ठिकाणाहून अटक केली. ही कारवाई नालेगाव परिसरातील वारुळाचा मारुती आणी सावेडी परिसरातील पंपिंग स्टेशन येथे १२ जुलै रोजी मध्यरात्रीच्या सुमारास केली.

तोफखाना पोलीस नालेगाव परिसरात पेट्रोलिंग गस्त करीत असताना वारुळाचा मारुती जवळ राजु माणीकराव कैकाडे (वय ३०, रा. वायडोंगरी, ता. पांढरकैडा, जि. यवतगाळ) याच्याकडे अधिक विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. यावरुन तो गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने फिरताना आढळला. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल सुजय हिवाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजू कैकाडे याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ अंतर्गत तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार गणेश लबडे हे करीत आहेत.

दुसऱ्या कारवाईत पंपिंग स्टेशन, धर्माधिकारी मळा परिसरात तोफखाना पोलिसांनी मध्यरात्री संशयितरित्या फिरणाऱ्या इसमास थांबवून पोलिसांनी त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रकाश रामनाथ गोल्हार (वय २७ रा. जवळवाडी, ता. पाथर्डी) असे सांगितले. पुढील चौकशीत त्याने उडवाऊडवीचे उत्तरे दिली. यामुळे रात्रीच्या वेळी चोरी करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याचा संशय बळकावल्याने त्यास ताब्यात घेतले. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल कपिल गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन प्रकाश गोल्हार याच्या विरुद्ध म. पो. का कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार रमेश गांगर्डे हे करीत आहेत.

### शकुंतला बोमादंडी यांचे वृध्दापकाळाने निधन

नगर - श्रमिकनगर, सावेडी येथील रहिवाशी शकुंतला बोमादंडी (वय ७५) यांचे १४ जुलै रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम, अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्यामागे पती, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. व्यंकटेश बोमादंडी यांच्या मातोश्री तर किशनराव बोमादंडी यांच्या त्या पत्नी होत.

### छबुबाई कोतकर यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर - केडगाव, लोंढेमळा येथील रहिवासी छबुबाई केशवराव कोतकर (वय ९०) यांचे १४ जुलै रोजी वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर केडगाव, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे एक मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. दत्तात्रय केशव कोतकर यांच्या त्या मातोश्री होत.

### राजाराम अल्ली यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सुडकेमळा येथील रहिवासी राजाराम चंद्रय्या अल्ली (वय ६०) यांचे १३ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम, अहिल्यानगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे पत्नी, मुलगा, दोन मुली, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चंद्रकांत अल्ली सर यांचे ते वडील होत.

### अच्युतराव बोरुडे यांचे वृध्दापकाळाने निधन



नगर - बोरुडेमळा, बालिकाश्रम येथील रहिवासी व हॉटेल पंचशीलचे संचालक अच्युतराव सिताराम बोरुडे (वय ८२) यांचे १३ जुलै रोजी सायंकाळी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम, अंत्यसंस्कार येथे करण्यात आले. त्यांच्यामागे दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. राजेंद्र, पंडित बोरुडे यांचे ते वडील होत.

### मोहनसिंग हिरा यांचे हृदयविकाराने निधन

नगर - गुलमोहररोड, चैत्रबन कॉलनी येथील जयहिंद ट्रान्सपोर्टचे संचालक मोहनसिंग बचनसिंग हिरा (वय ७०) यांचे १२ जुलै रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव, अमरधाम, येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. सोनी प्लायचे संचालक अवतारसिंग, बलवीरसिंग हिरा यांचे ते वडील तर दिनेश भाटिया (कन्नू) यांचे ते सासरे होत.



### पत्रकार सागर दुस्सल यांचे निधन



नगर - प्रेमदान हडको येथील रहिवासी पत्रकार सागर सुधाकर दुस्सल (४८) यांचे १४ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

### दत्तू पांढरे यांचे हृदयविकाराने निधन

नगर - नागरदेवळे येथील दत्तू दगडू पांढरे (वय ५५) यांचे १३ जुलै रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर नागरदेवळे, अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, सून, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. गणेश, पवन पांढरे यांचे ते वडील होत.

### शुभम साठे याचे अल्पशा आजाराने निधन



नगर - कल्याण रोड, श्रीकृष्णनगर येथील रहिवासी शुभम रमेश साठे (वय ३१) याचे १४ जुलै रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्यावर नालेगाव अमरधाम, येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्याच्यामागे वडील, एक भाऊ, बहीण असा परिवार आहे.

### सरस्वती कोठूळे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - खडकी, खंडाळा येथील रहिवासी सरस्वती साहेबराव कोठूळे (वय ७४) यांचे १३ जुलै रोजी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्यावर खडकी, खंडाळा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे एक मुलगी, सून असा परिवार आहे.


जमीयतुल कुरैश समाजाच्या झालेल्या जिल्हास्तरीय बैठकित जनावरांच्या खरेदी विक्रीचा व्यापार बंद करण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आला.

# शेतकऱ्यांकडून भाकड जनावरांचा व कायद्याने मान्यताप्राप्त असलेली जनावरे खरेदी - विक्रीचा व्यापार कुरैश समाजाने केला 'बेमुदत बंद'

नगर - नगर शहरातील जमीयतुल कुरैश समाजाची बेपारी मोहल्ला झेंडीगेट येथे जिल्हास्तरीय बैठक झाली. यात एकमुखाने समाज बांधवांच्या वतीने जनावरांची खरेदी विक्रीचा व्यापार बंद करण्यात आले असल्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाला सर्व समाज बांधवांनी स्वागत करत येणाऱ्या काळात जमीयतुल कुरैश समाजातील व्यक्ती जनावरांचा व्यापार करणार नसल्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

अधिकृत परवानगी असणाऱ्या जनावर खरेदी विक्री करण्यासाठी नेत असताना देखील काही संघटनेच्या वतीने जमीयतुल कुरैश समाजाला जाणून-बुजून टार्गेट केले जात आहे व पोलीस प्रशासनाला चुकीची माहिती देऊन कोणताही पुरावा नसताना खोटे गुन्हे दाखल करण्याचे काम करत असून कायद्याने मान्यताप्राप्त जनावर आणली तरी त्रास होत आहे. संपूर्ण जिल्ह्यात चालू असलेल्या गोहतेच्या नावाखाली चालू असलेली दहशत तथाकथित गोरक्षक यांच्याकडून जमीयतुल कुरैश समाजातील व्यक्तींनी व्यापारासाठी आणलेले जनावरे हे कतलीसाठी घेऊन जात असल्याचा खोटा आरोप करत पोलिसांच्या ताब्यात देऊन मारहाण करून पैसे काढून गुन्हे दाखल होऊन वाहने व आदी साहित्य जप्त होत असल्याने यामध्ये मोठा नुकसान होत आहे. त्यामूळे कुरेशी समाज हा जनावरांची खरेदी विक्रीचा व्यवसाय बेमुदत बंद केला.

जनावरे खरेदी-विक्री करत असून शेतकरी व खाटीक यांची एक नाळ आहे. ज्या शेतकऱ्यांची भाकड जनावरे असतात, जे दूध देत नाही, काम करत नाही, हे फक्त खाटीकशिवाय विकत कोणीच घेत नाही व कायद्याने मान्यताप्राप्त त्या जनावरांना हे पैसे देऊन जनावरे खरेदी करतात, मात्र काही संघटनेचे लोक खाटीकांना मारहाण करून त्यांच्यापासून पैसे घेतात व रितसर कागदपत्र असताना देखील अडवत आहे. त्यामुळे संपूर्ण खरेदी-विक्रीचा व्यवहार बंद करून लवकरच संपूर्ण जिल्ह्यात समाजाच्या वतीने शासनाला निवेदन देण्यात येणार असल्याचे देखील सांगण्यात आले. बैठकीत संपूर्ण जिल्ह्यातील जमीयतुल कुरैश जमातचे पदाधिकारी व समाज बांधव उपस्थित होता.

## हॉटेल मॅनेजरकडून ग्राहकास लोखंडी पाईपने बेदम मारहाण

नगर - नीट व्यवस्थित समजून सांगा असे म्हटल्याचा हॉटेल मॅनेजरला ग्राहकाचा राग आल्याने मॅनेजरने ग्राहकास शिवीगाळ दमदाटी करीत लोखंडी पाईपने बेदम मारहाण करुन ठार मारण्याची धमकी दिली. ही घटना नगर पुणे रोडवरील कामरगाव शिवारातील हॉटेल श्री गुरुदेव येथे १३ जुलै रोजी सकाळी आठ वाजता घडली.

याबाबत सुबोध किशोर मावले (वय २८, मूळ रा. इंदोर, हल्ली रा. लक्ष्मी चौक, हिजवंडी ता. मुळशी पुणे) यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की फिर्यादी हे पुणे येथे खाजगी वाहनाने जात असताना हॉटेलमध्ये नाश्ता करण्यासाठी उतरले, फिर्यादी हे हॉटेलच्या काउंटरवर टेकून उभे राहिले असता हॉटेल मॅनेजर (नाव माहित नाही) म्हणाले की तू तिकडे टेबलवर बसून घे. येथे कशाला मरतोस असे म्हटल्याने फिर्यादी यांनी तुम्ही नीट व्यवस्थित सांगा असे म्हटले याचा राग आल्याने हॉटेल मॅनेजर याने फिर्यादीस शिवीगाळ करुन तेथे पडलेल्या लोखंडी पाईपने फिर्यादीच्या डाव्या पायाला, डाव्या दंडावर बेदम मारहाण करुन तू येथून, हॉटेलमधून निघून जा. नाहीतर तुला जीवेच ठार मारीन अशी धमकी दिली व गचांडी पकडून फिर्यादीस हॉटेलच्या बाहेर हाकलून दिले. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात सुबोध मावले यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन हॉटेल मॅनेजर याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला.

# गृहिणी

## आरोग्य

### यांनी कॉफी पिणे टाळावे

कॉफी हे जगातील सर्वात लोकप्रिय पेयांपैकी एक आहे. आपल्यापैकी बरेच जण आपला दिवस कॉफीने सुरू करतात आणि अनेकांसाठी कॉफी रात्री उशिरापर्यंत चालू राहते. तथापि, कॉफीचे सेवन अनेक आरोग्य फायदे देते, परंतु काही लोकांसाठी, त्याचे सेवन विषासारखे असू शकते. यामुळे त्यांच्या सध्याच्या आरोग्य समस्या वाढू शकतातच, शिवाय अनेक नवीन आजारांनाही जन्म देऊ शकतो. गर्भधारणेदरम्यान गर्भवती महिलांना कॉफीचे सेवन टाळण्याचा सल्ला दिला जातो. जास्त कॅफिन गर्भाच्या विकासावर परिणाम करू शकते आणि गर्भपात किंवा अकाली प्रसूतीचा धोका वाढवू शकते. जर तुम्हाला झोपेचा त्रास होत असेल किंवा तुम्हाला निद्रानाश असेल तर तुम्ही कॉफी टाळावी. कॅफिन हे एक उत्तेजक आहे जे तुमच्या मध्यवर्ती मज्जासंस्थेला सक्रिय करते, ज्यामुळे तुम्हाला बराच वेळ झोप लागणे कठीण होते त्याचबरोबर हृदयरोगाने ग्रस्त असलेल्या लोकांनी कॉफीचे सेवन खूप काळजीपूर्वक करावे. जास्त कॅफिनमुळे रक्तदाब आणि हृदय गती वाढू शकते, जे धोकादायक ठरू शकते. अशा लोकांनी डॉक्टरांचा सल्ला घेतल्यानंतरच कॉफी प्यावी. तज्ञांच्या मते, कॉफी हे मायग्रेनमध्ये विष आहे. त्यात कॅफिनचे प्रमाण जास्त असल्याने, ते मायग्रेनला चालना देते आणि वेदना होत असताना ते प्यायल्याने मायग्रेनचा त्रास वाढतो.

## पाककला

### कुर्मा पुरी

**साहित्य :** १ वाटी मटार दाणे, २ बटाटे, वाटी भरून फ्लॉवरचे तुरे, २ टोमॅटो, २ कांदे बारीक चिरलेले, १ टेबलस्पून आले लसूण पेस्ट, २ टेबलस्पून लाल तिखट, १ टेबलस्पून धने जीरे पूड, कोथिंबीर, मीठ चवीनुसार, २ टेबलस्पून तेल, २ वाट्या गव्हाचे पीठ

**कृती :** सर्वप्रथम कढईत तेल गरम करावे आणि जीरे मोहरी कढीपत्त्याची फोडणी द्यावी त्यानंतर त्यात कांदा आणि आले लसूण पेस्ट घालून छान परतून घ्यावे सर्व भाज्या चिरून घ्याव्यात. कांदा ट्रान्सपरंट भाजला की त्यात टोमॅटो बारीक चिरून घालावा. टोमॅटो लवकर शिजण्यासाठी त्यात मीठ आधी टाकून घ्यावे आणि त्यात धने जीरे पूड, लाल तिखट, मीठ, हळद घालावे. त्यानंतर त्यात चिरलेल्या सर्व भाज्या घालाव्यात. भाजी शिजण्याकरता आवश्यक तेवढे पाणी घालावे आणि झाकण ठेवून दहा मिनिटे शिजू द्यावे त्यानंतर बटाटा थोडासा स्मॅश करावा आणि त्यात वरून कोथिंबीर भुरभुरावी तयार आहे आपला कुर्मा आता सोबत पुरी खाण्याकरता गव्हाच्या पिठात थोडे तेल आणि थोडासा चमचाभर रवा घालून मीठ टाकून कणिक मळून घ्यावी आणि त्याची पोळी लाटून गोलाकार कट करून घ्यावेत. गरम तेलात पुऱ्या तळून घ्याव्यात.

## वास्तू

चिंचेच्या झाडावर वाईट आत्मे वास करतात असे मानले जाते. असे म्हणतात की चिंचेभोवती जास्त वेळ राहिल्याने चक्कर येणे, अशक्तपणा जाणवणे, मळमळ होणे यांसारखी लक्षणे उद्भवतात, कदाचित त्यामुळेच त्यात भूत वावरण्याची कल्पना रूढ झाली आहे. चिंचेच्या झाडाच्या आजूबाजूच्या वातावरणात खूप जास्त आम्लता असते जी आरोग्यासाठी हानिकारक असते.

## सल्ला

बटाटे उकडताना मीठ टाकल्यास ते फुटत नाहीत आणि सोलणेही सोपे होते.

## सौंदर्य

पावसाळ्यात त्वचा निर्जीव दिसते. बीटरूट स्क्रब कोरड्या आणि निर्जीव त्वचेला निरोगी बनवण्यास मदत करते आणि त्वचेशी संबंधित अनेक समस्या दूर ठेवते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १५ जुलै २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ कृष्णपक्ष, शततारा ०६।२६ पू.भा.२८।५१, सूर्योदय ०६ वा. ३३ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

### राशिभविष्य

**मेष** : पैसा खर्च होईल. संतती बरोबर मतभेद किंवा त्यांच्या चिंतेत मन व्यग्र राहील. सामाजिक कार्यात आघाडी घ्याल.

**वृषभ** : नवीन कामाची सुरुवात करण्याला अनुकूल दिवस. मित्रांबरोबर दिवस आनंदात घालवाल. मागील देणी वसुल होतील.

**मिथुन** : विद्यार्थ्यांना आज अभ्यासात रस वाटणार नाही. शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकाल. आध्यात्मिकतेतून शांती मिळेल.

**कर्क** : मित्र आणि कुटुंबीय यांच्याबरोबर आनंदात दिवस घालवाल. प्रवास, सहली यातूनही आज आनंद मिळवू शकता.

**सिंह** : आध्यात्मिकतेच्या मदतीने विचारातील नकारात्मकता दूर कराल. मनाच्या एकाग्रतेमुळे सर्व कामात फायदा होईल.

**कन्या** : स्वकीयांचा वियोग घडू शकतो. कुटुंबातील लोकांशी मतभेद संभवतात. मिळणाऱ्या मोठे व्यावसायिक नुकसान होणयाची शक्यता आहे.

**तूळ** : देण्या-घेण्याचे निर्णय विचारपूर्वक घ्या. अपघात व गैरसमज यापासून दूरच राहा. वाहने सावकाश चोरीला जातील.

**वृश्चिक** : शारीरिकस्वास्थ्य बिघडू शकते. विनाकारण खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**धनु** : आज अध्यात्माकडे कल राहिल. जुने मित्र व नातेवाईक यांच्या सहवासामुळे दिवस आनंदात व्यतीत होईल.


**मकर** : उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवून कार्ये शांततेत केल्यास आजचा दिवस हा यशदायी ठरेल. उधारी वसुल होईल.

**कुंभ** : हितशत्रुंपासून पिडा संभवते. संततीसौख्य लाभेल. कोर्ट-कचेरी आदी गोष्टींपासून लांब रहा.

**मीन** : आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. तब्येत सांभाळा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२२० सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२१९ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) सारखा; समान; बरोबर ३) एक मोगल बादशहा ७) वसुदेवाचा पुत्र म्हणून कृष्णास असेही नाव पडले ९) पक्षी वगैरेंचे छोटे घर १०) कमानीखालचा भर ११) दुसरा; निराळा; भिन्न १२) कपड्यांवर वगैरे केलेली कलाकुसर १४) माळ; बरोबरी; तुलना; हार १५) अनेक कुटुंबे राहत असलेले मोठे घर १७) थोडेसे लाल १९) काख २१) बारीकसारीक गोष्टींचे केलेले टिपण किंवा मजकूर २३) बसल्याबसल्या येणारा झोपेचा झटका २४) जय; यश; सफलता २५) भोजनातील एक आवश्यक घटक (भाजी, वरण वगैरे)

**उभे शब्द :-** १) प्रश्नोत्तर २) कच्चा मजकूर; खर्डा ३) निर्जीव शरीर; प्रेत; मुडदा ४) निकृष्ट; अधम; शेवटचे ५) माळ; पराभव; सर; अपयश ६) परमेश्वर ८) लग्न वगैरे कार्यांच्या सिद्धीसाठी स्थापन केलेली देवता ११) न्यायालय (उर्दू) १३) दगड धोंडा १४) जवळ पाशी; बरोबर; श्रेष्ठपणा; वर्चस्व १६) दुरुस्ती १८) हातपाय पसरून; सर्व अंग टेकून २०) गायनातील एक राग २२) उग्र वासाचा एक कंद

# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

: संकलक :
ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : ध्येय नसलेला माणूस हा दिशाहीन जहाजासारखा असतो.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### दारु प्यायल्यानंतर शरिरात कोणत्या प्रक्रिया घडतात?

हे खरे आहे का की दोन-चार पेग प्यायल्यानंतर आपल्याला हलके वाटते आणि आपण सर्वकाही विसरू लागतो. पण आजच्या धावपळीच्या जगात, तुम्ही कधी विचार केला आहे का की दारू आरोग्यासाठी आणि खिशासाठी किती हानिकारक आहे! ते केवळ शरीराला आतून पोकळ करत नाही तर तुमचा खिसा देखील रिकामा करते. साहित्य असो, चित्रपट असो किंवा आपले दैनंदिन जीवन असो, तुम्हाला अल्कोहोलच्या हानीशी संबंधित अनेक उदाहरणे ऐकायला मिळतील (अल्कोहोल इफेक्ट ऑन ब्रेन). तुम्ही स्वतः पाहिले असेल की लोक अल्कोहोलच्या प्रभावाखाली कसे आपले संतुलन गमावतात, काही काळापूर्वी काय घडले ते विसरून जातात आणि अनेकदा कोणत्याही कारणाशिवाय हसणे किंवा रडणे सुरु करतात. परंतु या काळात आपल्या शरीरात कोणते हार्मोनल बदल होतात याचा कोणीही विचार करत नाही.

दारू पिल्यानंतर, शरीरात सर्वात आधी सोडले जाणारे डोपामाइन हार्मोन आहे, ज्याला आनंदाचे संप्रेरक असेही म्हणतात. डोपामाइन मेंदूच्या रिवॉर्ड सिस्टमला गती देते, ज्यामुळे व्यक्तीला त्वरित आनंद आणि समाधान मिळते. न्यूरोसायंटिस्ट स्पष्ट करतात. दारू पिल्यानंतर, डोपामाइनची पातळी खूप वेगाने वाढते, ज्यामुळे व्यक्ती आपला ताण आणि दुःख विसरून आनंदात बुडते.

दारू पिल्यानंतर, सेरोटोनिनची पातळी देखील प्रभावित करते. हा हार्मोन मूड स्थिर करण्यात आणि तणाव कमी करण्यात महत्वाची भूमिका बजावतो. दारू पिल्यानंतर लगेचच, सेरोटोनिनची पातळी खूप वेगाने वाढते, ज्यामुळे व्यक्तीला शांतता आणि हलकेपणा जाणवतो. तथापि, तज्ञ म्हणतात की हा परिणाम तात्पुरता आहे आणि दीर्घकालीन अल्कोहोल सेवन सेरोटोनिनचे संतुलन देखील बिघडू शकते.

अधिक अल्कोहोल सेवन केल्याने एंडोर्फिन हार्मोन देखील सोडला जातो, ज्यामुळे शरीरातील वेदना कमी होतात आणि तणाव आणि भावनिक वेदना कमी होण्यास देखील मदत होते. जेव्हा तुम्ही अल्कोहोल पिता तेव्हा एंडोर्फिन सोडल्याने तुम्हाला आराम आणि हलके वाटते, जे दुःख विसरण्यास मदत करते.

दारू मेंदूतील ग्लूटामेट हार्मोन्सच्या संतुलनावर देखील परिणाम करते. मेंदूला शांत करते, तर ग्लूटामेट उत्साह वाढवते. अल्कोहोल क्रिया वाढवून मेंदूला शांत करते. ज्यामुळे व्यक्ती तणावमुक्त आणि आरामदायी वाटते. अशाप्रकारे, लोक दारू पिऊन त्याला एक लोकप्रिय साधन बनवून ताण विसरून जातात.

दारू पिल्याने तात्काळ आराम मिळतो, परंतु तज्ञांचा असा इशारा आहे की हा परिणाम तात्पुरता असतो. दीर्घकाळ दारू पिल्याने हार्मोन्सचे संतुलन बिघडू शकते, ज्याचा मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर वाईट परिणाम होतो. दुःख विसरण्यासाठी दारू हा तात्काळ उपाय असू शकतो, परंतु तो आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे.

## संतांची शिकवण

एक संत एका गावात राहत होते. जेव्हा जेव्हा ते नाचायचे तेव्हा पाऊस पडत असे. म्हणून, जेव्हा जेव्हा गावकऱ्यांना पावसाची गरज पडायची तेव्हा ते संतांकडे जायचे आणि त्यांना नाचण्याची विनंती करायचे. आणि जेव्हा ते नाचू लागले तेव्हा नक्कीच पाऊस पडायचा. काही दिवसांनी, शहरातून चार मुले गावाला भेट देण्यासाठी आली. जेव्हा त्यांना कळले की संत नाचतात तेव्हा पाऊस पडतो, तेव्हा त्यांना विश्वासच बसत नव्हता. त्यांच्या शहरी शिक्षणाच्या अभिमानाने, त्यांनी गावकऱ्यांना आव्हान दिले की जर आपणही नाचलो तर पाऊस पडेल आणि जर आपण नाचत असताना पाऊस पडला नाही तर तो संत नाचत असतानाही पाऊस पडणार नाही. मग काय झाले की दुसऱ्या दिवशी, पहाटे, गावकरी त्या मुलांना संतांच्या झोपडीत घेऊन गेले.

संतांना सर्व काही सांगण्यात आले, मग मुले नाचू लागली. अर्धा तास गेला आणि पहिला मुलगा थकून बसला पण ढग दिसत नव्हते. काही वेळाने, दुसऱ्यानेही तसेच केले आणि एक तासानंतर, इतर दोन मुलेही थकून बसली पण पाऊस पडला नाही.

आता साधूची पाळी होती, तो नाचू लागला, एक तास गेला, पाऊस पडला नाही, साधू नाचत राहिला... दोन तास झाले, पाऊस पडला नाही... पण साधू थांबायला तयार नव्हता, हळूहळू संध्याकाळ होऊ लागली, मग ढगांचा गडगडाट ऐकू आला आणि मुसळधार पाऊस पडू लागला. मुले स्तब्ध झाली आणि त्यांनी लगेच साधूची माफी मागितली आणि विचारले. साधूने उत्तर दिले - जेव्हा मी नाचतो तेव्हा मी दोन गोष्टी लक्षात ठेवतो, पहिली गोष्ट म्हणजे मी नाचलो तर पाऊस पडेल आणि दुसरी म्हणजे पाऊस पडेपर्यंत मी नाचेन.

तात्पर्य : जर आपल्याला यश मिळवायचे असेल तर आपल्याला त्या संतासारखे आपले ध्येय साध्य करावे लागेल.

## जीवन का अमृत (भाग १)



### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

बार इसके तरीके मेंखामी, प्रेम और भक्ति की कमी, गलत भोजन के सेवन और दूसरे तरीकों से मिला देने के कारण होती है। सारी की सारी कमियाँ शिष्य की ओर से ही आती हैं। यह रास्ता दो जन्मा होने का है और प्रभु के साम्राज्य में प्रवेश करने का है। मरना सीख जाओ ताकि तुम जीने लगो, यह हमें ईसा मसीह ने और सभी महात्माओं ने सिखाया। आप सौभाग्यशाली हैं कि आपको प्रभु का रास्ता बता दिया गया है। यदि आप इस रास्ते पर चलना चाहते हैं, गंभीरता से, सत्गुरु में पूर्ण विश्वास के साथ, तो सत्गुरु की दया से, गुरु-सत्ता आपको हर प्रकार की सहायता देगी। आप अपनी डॉयरी भेजकर इसकी शुरुआत कर सकते हैं; लिखें कि आप शाकाहारी भोजन के प्रति वफादार हैं कि नहीं। आप जरुर शांति और आनंद पायेंगे और आपकी जिंदगी बदल जाएगी। पर यदि आपने किसी और प्रकार का ध्यानाभ्यास करने का फैसला किया है, तो आप स्वतंत्र हैं। मेरी शुभकामनाएँ हमेशा आपके साथ रहेंगी। यदि और तरीके अपनाने के बाद आप संतों के रास्ते पर वापिस आना चाहें, तो मैं खुले दिल से आपका स्वागत करूँगा। गुरु-शक्ति आपके सिर पर हैं और आपको कभी नहीं छोड़ेगी, न ही कभी भूलेगी, दुनिया के अंत तक। अंतर में प्रकाश के पार जाने के लिए आप उसके बीच में टकटकी लगाकर देखते जाएँ, जिससे प्रकाश तेज़ हो जाएगा और फूटकर आगे का रास्ता दे देगा। इसी प्रकार दायीं ओर से आने वाली शब्द-धुन को पूर्ण एकाग्रता से सुनना चाहिए बेहतर होगा अगर उकड़ूं बैठकर सुनें। अगर आप एकाग्रचित होकर अंतर में देख सकें और सुन सकें, तो मन का इधर-उधर दौड़ना रुक जाएगा।

ज्योति और श्रुति इतने प्रभावशाली हैं कि अगर हम इनमें खो जाएँ तो मन शांत हो जाता है। भजन-सिमरन से पहले आप कुछ प्रार्थना कर सकते हैं, जिससे आपके चारों ओर इसका वातावरण बनेगा और आप सत्गुरु की उपस्थिति महसूस करके खुश होंगे। कृपया याद रखें कि मन स्वयं में जड़ है, यह आत्मा से जिंदगी पाता है और अगर यह अंतर में प्रभु के इजहार से जुड़ जाए, तो शांत हो जाता है।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

आहार जीवन का आधार है। सूक्ष्म जीवाणु, मनुष्य, जानवर, पौधे सभी भोजन ग्रहण करते हैं। हमारा शरीर मन का स्थूल रुप है। ये जो मुख में थूक बनती है, ये विचारों का तरल रुप है। ये तरल पेट में जाता रहता है और वहां खाने में मिल कर सारे शरीर के निर्माण में लगा रहता है। ऐसे ही हमारे शरीर में जो हार्मोन बन रहे हैं वह भी विचारों के प्रभाव से बनते हैं और यह हार्मोन शरीर के भिन्न भिन्न अंगो का निर्माण करते हैं। भोजन एक ऐसी चीज है जिसके स्थूल भाग से शरीर बनता है और सूक्ष्म भाग से मन बनता है। ऐसे भोजन और दिमाग का एक दूसरे पर गहरा असर पड़ता है। आहार से रक्त ही नहीं मन भी बनता है। तामसिक आहार वह भोजन है जो मन को नाकारात्मक विचारों के लिये उत्तेजित करता है। मिर्ची, खट्टी चीजें, हींग, इमली, प्याज, लहसुन, चीनी, चाय, काफी, मांस अंडे और नशीले पदार्थ ये सब तामसिक भोजन हैं। तीन घंटे से ज्यादा देर तक रखा गया भोजन भी तामसिक है। ये बिस्कुट, ब्रेड, मट्ठी तथा इस तरह की अन्य चीजें आदि सब तामसिक हैं। इन में से कुछ जैसे चाय, काफी, हींग, इमली आदि कम तामसिक हैं परंतु यह शरीर के लिये जरुरी हैं, इसलिये इन का प्रयोग निषेध नहीं किया गया। फिर भी यह जितना कम हो सके अच्छा है। राजसिक आहार वह आहार है जिस से हम शक्तिशाली बनते हैं तथा दूसरों पर या जिनके हम मुखिया हैं उन पर राज करना चाहते हैं। घी, तेल, माखन, तथा पकवान व मिठाईयां ये सब रजोगुणी भोजन हैं। ये सारी दुनिया खाती है। इसलिये हरेक मनुष्य स्वभाव से दूसरो पर प्रशासन करना चाहता है। बड़ी मछली छोटी मछली को खाती है। सात्विक भोजन वह है जिस से हमारे में सतोगुणी विचार उत्पन होते हैं। हम दूसरो को सुख देना चाहते हैं। फल फ्रूट, हरी सब्जियां, सादी दाल रोटी व दूध और ड्राइ फ्रूट ये सब सात्विक भोजन हैं। महान योगी बनने के लिये सात्विक भोजन का प्रयोग करें। भोजन के पदार्थों को प्राप्त करने के लिये धन भी सात्विक होना चाहिये। अगर गलत पैसे से भोज्य पदार्थ खरीदेगें तो यह तामसिक आहार होगा वह चाहे फल व सब्जियां हों। इन के खाने से मन दूषित होगा। यही मनुष्य के पतन का कारण बनता है। बाबा जो अनन्य बच्चे थे उनके धन से रसोई का कार्य करते थे। जो भी व्यक्ति व संस्था पैसे के नियम का उलंघन करेगा उसकी आन्तरिक उन्नति रुक जायेगी।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**नवरा :** अगं, ऐकलंस का? घरी पाहुणे आलेत ना,
त्यांना जेवणाचे विचार जरा...
**भाऊजी :** भाऊजी, तुम्ही घरुन जेवून
आलात की घरी गेल्यावर जेवणार?

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ देशातील पहिला एआय आणि रोबोटिक्स टेक्नॉलॉजी पार्क कोठे आहे?
– बंगळूरू

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

### बौद्धिक विकास कसा करावा?

परंतु ते जसजसे मोठे होईल तसे ते प्रतिसाद देण्यास सुरुवात करेल. त्याच्या मेंदूमध्ये अंदाजे १०० बिलियन्स पेशी (न्यूरॉन्स) असतात. या पेशींना कार्यरत करण्यासाठी असे प्रयोग करणे गरजेचे आहे. एखाद्या चित्रातील रंग, प्राणी, अक्षर ओळखण्यासाठी बाळाच्या ३६ दशलक्ष पेशी कार्यान्वित होतात. तीन वर्षांच्या आत किंवा फार तर सहा वर्षांपर्यंत मेंदूतील या पेशींना कार्यान्वित करण्याचा प्रयत्न केला नाही, तर भविष्यात पुढे त्या विशिष्ट पेशींचा भाग निष्क्रिय राहील. अशा निष्क्रिय पेशी भविष्यात कार्यक्षम बनविण्याचा प्रयत्न केला, तरीही बालवयात जेवढा प्रतिसाद मिळतो, तेवढा मिळणार नाही.

बाळाला जर एखादी परभाषा शिकवायची असेल, तर लहान वयात त्या बाळाला रोज एक तास परकीय भाषा येणाऱ्या माणसाच्या संपर्कात नियमित ठेवावे. बाळ एका वेळी कमीत कमी १०-१५ भाषा शिकू शकते. एवढी त्याची शिकण्याची व आत्मसात करण्याची तयारी असते. त्याच्या या शिकण्याच्या जिद्दीला आपण पुरे पडायला हवे. बाळाच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर आपण द्यायला हवे. बाळ बुद्धिमान होण्यासाठी त्याला वेगवेगळ्या गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक आहे. कुतूहलापोटी त्याने एखाद्या गोष्टीबद्दल विचारले, तर त्याचे लगेच उत्तर द्यावे. उत्तर देणे टाळू नये.

उदा. त्याने गॅलरीतून एखादी कार बघितली असेल, तर तो विचारेल हे काय आहे? त्या वेळी त्याला ही लाल रंगाची कार आहे, अशा पद्धतीने उत्तर द्यावे आणि दोन ते तीन दिवसांत वेगवेगळ्या कंपनीच्या व विविध रंगाच्या कार त्याला कम्प्युटरवर किंवा पुस्तकातून दाखवाव्यात. काहा दिवसांमध्येच तो सर्व कार नावानिशी ओळखायला लागेल. जरी त्याला स्पष्ट बोलता येत नसेल, तरी त्याच्या मेंदूमध्ये ही सर्व माहिती संग्रहित झालेली असते.

मनाला अगदी छोट्या बाळाला एका अक्षरापासून सुरुवात करून हळूहळू अक्षरे वाढवीत न्यावीत. अगदी पहिल्याच दिवसापासून मराठी, इंग्रजी अक्षरे दाखवावीत. तसेच भविष्यात गणित विषयाचे आकलन सोपे जावे, म्हणून अंकसुद्धा पहिल्या दिवसापासून दाखवावेत.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००



मानकन्हैया ट्रस्ट व आनंदऋषी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राजयोगा जीवनपद्धतीच्या अभ्यासक डॉ. सुधाताई कांकरिया लिखित हृदय आरोग्याच्या गप्पागोष्टी या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे आदी.

# मन, शरीर आणि आत्म्याचा समतोल साधणारी जीवनपद्धती आत्मसात करावी

**सभापती प्रा.राम शिंदे यांचे प्रतिपादन; हृदय आरोग्याच्या गप्पागोष्टी पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात**

नगर – आधुनिक जीवनशैलीत मन, शरीर व आत्म्याचा समतोल साधणारी सकारात्मक जीवनपद्धती आत्मसात करणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी येथे केले.

मानकन्हैया ट्रस्ट व आनंदऋषी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राजयोगा जीवनपद्धतीच्या अभ्यासक डॉ. सुधाताई कांकरिया लिखित हृदय आरोग्याच्या गप्पागोष्टी या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या वेळी आमदार संग्राम जगताप, पद्मश्री डॉ. पोपटराव पवार, डॉ. रतन राठोड, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. सुनिल म्हस्के, बि.के. निर्मला दिदी, अभय आगरकर, डॉ. वसंत कटारिया, संतोष बोथरा, डॉ. प्रकाश कांकरिया, लेखिका डॉ. सुधा कांकरिया, डॉ. वर्धमान कांकरिया उपस्थित होते.

या पुस्तकात केवळ शारीरिक नव्हे तर मन, शरीर व आत्म्याच्या संतुलनावर आधारित आरोग्यदृष्टीकोन मांडण्यात आला आहे. आधुनिक जीवनशैलीतही सकारात्मक व निरोगी जीवन जगता येईल, यावर मार्गदर्शन करणारे हे पुस्तक सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असेही प्रा. शिंदे यांनी सांगितले.

आजच्या धकाधकीच्या जीवनात डॉ. सुधाताई कांकरिया यांनी मांडलेले विचार हे अंतर्मुख करून आरोग्यदृष्टीने नवा दृष्टीकोन देणारे आहेत, असे सांगत त्यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच, डॉ. कांकरिया यांचे नाव नोबेल शांतता पुरस्कारासाठी नामांकित झाल्याचा उल्लेख करत त्यांचे अभिनंदन केले.

# श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त १७ जुलैपासून भव्य अखंड हरिनाम सप्ताह



श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने माळीवाडा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्याच्या मंडप उभारणी कामाचा शुभारंभ श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगमनाथ महाराज यांच्या हस्ते झाला.

नगर – श्री संत सावता महाराज पुण्यतिथीनिमित्त उत्सव समितीच्यावतीने माळीवाडा येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. त्याच्या मंडप उभारणी कामाचा शुभारंभ श्री विशाल गणेश मंदिरचे महंत संगम नाथ महाराज यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी उत्सव समितीचे अध्यक्ष छबु नाना जाधव, कैलासराव खरपुडे, सतीश डागवाले, सुभाष राऊत, बाळासाहेब पुंड, चंद्रकांत ताठे, अनिल चेडे, सोमनाथ नागापुरे, विकास पटवेकर, बजरंग भुतारे, अशोकराव कापरे, शरद चाफेकर, भिमराज जाधव, अमोल धाडगे, विशाल जाधव, विनायक आंबेकर, भाऊसाहेब पुंड, सुनिल राऊत, बबनराव केवटे, मंदार सटाणकर, सुनिल पडोळे, विष्णुपंत म्हस्के आदि उपस्थित होते.

यंदाही सप्ताहाची तयारी करण्यात आली असून, आज मंडप उभारणीने त्याची सुरुवात केली आहे. १७ ते २४ जुलैपर्यंत होणार्या या सप्ताहाचा भाविकांनी लाभ घ्यावा. या सप्ताहाचा शुभारंभ १७ जुलै रोजी सकाळी ११ वा. दिपप्रज्वलनाने होईल. त्यानंतर रात्री ८ वा. हभप निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरिकर) यांचे किर्तन होईल. १८ जुलै रोजी रात्री ८ वा. हभप आनंद महाराज तांबे (थेऊर), १९ जुलै रोजी हभप गणेश महाराज खेडकर (आळंदी), २० जुलै रोजी हभप गंगाधर महाराज राऊत (श्रीक्षेत्र पैठण), २१ जुलै रोजी हभप गुलाब महाराज खालकर (रामायणाचार्य), २२ जुलै रोजी हभप प्रदिप महाराज जाधव (करमळा), २३ जुलै रोजी दुपारी ४ ते ७ यावेळेत दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. आणि रात्री ८ वाजता हभप मंदाताई महाराज पवार (पिंपळा) यांचे किर्तन होईल. २४ जुलै रोजी सकाळी १० वा. हभप ज्ञानेश्वर महाराज वाबळे (आळंदी देवाची) यांचे काल्याचे किर्तन होईल. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन माळीवाडा पंच मंडळ देवस्थानच्यावतीने करण्यात आले आहे. या सप्ताह कालावधीत रोज सकाळी काकडा भजन, ज्ञानेश्वरी पारायण होईल, व्यासपीठ चालक प्रभाताई भोंग करतील. दुपारी २ ते ५ या वेळेत श्री पर्जन्येश्वर, श्री कपिलेश्वर, श्रीनाथ, श्री संत शिरोमणी सावता महाराज, सावता महाराज या महिला भजनी मंडळाचा कार्यक्रम होईल. सायं. ५ ते ७ हरिपाठ, रात्री ८ वा. किर्तन सेवा.

सप्ताह काळात गायनाचार्य, मृदूंगाचार्य, हार्मोनियम वादक, विणेकर, चोपदार, सेवेकरी सेवा देत आहेत. सप्ताह यशस्वीतेसाठी श्री संत शिरोमणी सावता महाराज उत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व अभिषेक खंदारे, केशव मोकाटे, सागर जाधव, रमेश बनकर, कमलेश खरपुडे, समर्थ पुंड, मोहित चौधरी, विशाल उदावंत, अक्षय आंबेकर, अक्षय म्हस्के, नितेश आंबेकर, तनय बोरुडे, उदय पटवेकर, संतोष मेहेत्रे, निखिल डागवाले, संतोष मोकाटे, वैभव आंबेकर, गौरव डागवाले, ऋषिकेश राऊत, मोहित ढवळे, रवि रांधवने, प्रविण कानडे, गोरख कानडे, गणेश राऊत, अनिल फुलसौंदर आदी प्रयत्नशील आहेत.

# अंबिका महिला बँकेच्या कर्मचाऱ्यांना १५% पगारवाढ

**जिल्हा सहकारी बँक्स एम्प्लॉईज युनियन व बँकेत करार**

नगर – शहरातील अंबिका महिला सहकारी बँक व अहमदनगर जिल्हा सहकारी बँक्स एम्प्लॉईज युनियन यांच्यात नुकताच करार होऊन, बँक कर्मचाऱ्यांना १५% पगारवाढ देण्यात आली. १ जुलै २०२५ पासून हा वेतनवाढीचा करार पुढील ५ वर्षाकरीता असणार आहे.



अंबिका महिला बँकेच्या कर्मचाऱ्यांना १५% पगारवाढ झाल्याबददल युनियनच्या वतीने मेधाताई काळे यांचा सत्कार करुन त्यांचे आभार मानण्यात आले. याप्रसंगी उपस्थित असलेले संचालक व पदाधिकारी.

वेतनवाढीच्या करारावर युनियनतर्फे कार्यकारी अध्यक्ष धनंजय भंडारे, खजिनदार मुरलीधर कुलकर्णी, सह सचिव नितीन भंडारी, मॅनेजिंग कमिटी सदस्य संतोष मखरे, बँक व्यवस्थापनातर्फे संस्थापिका चेअरमन मेधाताई काळे, चेअरमन सरोजनी चव्हाण, व्हाईस चेअरमन ॲड. विजया काकडे, संचालिका शांता मोरे, सीईओ अंकुश गायकवाड यांनी सह्या केल्या.

या करारान्वये बँक व्यवस्थापनावर आर्थिक बोजा पडणार आहे. यामध्ये अतिरिक्त वेतनवाढ, महागाई भत्यात वाढ, बोनस, वाहन भत्ता, मेडिकल, शिक्षण या भत्यात वाढ करण्यात आली आहे. या कराराने कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरातील अंबिका महिला बँकेच्या मुख्य शाखेत वेतनवाढी कराराची बैठक पार पडली.

मेधाताई काळे यांनी अनेक वर्षापासून बँकेचे युनियनशी अत्यंत सौजन्याचे नाते असल्याचे स्पष्ट करुन महागाईचा विचार करुन कर्मचाऱ्यांना पगारवाढ देण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. धनंजय भंडारे यांनी महिला बँकेसह युनियनचे एक वेगळे ऋणानुबंध असून, कर्मचाऱ्यांसाठी एकमताने त्यांच्या हिताचे निर्णय घेतले जातात. कोणतेही मतभेद न ठेवता हा करार खेळीमेळीच्या वातावरणात पार पडत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी युनियनच्यावतीने मेधाताई काळे यांचा सत्कार करुन त्यांचे आभार मानण्यात आले. तर बँक प्रशासनाच्या वतीने धनंजय भंडारे यांचा सत्कार करण्यात आला.

# प्रा.मसिरा कुलकर्णी यांची आयआयटी कानपूर येथे एसीएम – डब्ल्यू इंडिया ग्रॅज्युएट कोहोर्टसाठी निवड



नगर – जीएचआरसीईएम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट (जीएचआरसीईएम), पुणे येथील सीएसई (सायबर सिक्युरिटी ॲण्ड डेटा सायन्स) विभागाच्या फॅकल्टी सदस्य आणि सहाय्यक प्रा. मसिरा सुलतान कुलकर्णी यांची आयआयटी कानपूर येथे होणाऱ्या एसीएम–डब्ल्यू (असोसिएशन फॉर कॉम्प्युटिंग मशिनरी, वुमेन्स चॅप्टर) इंडिया ग्रॅज्युएट कोहोर्ट २०२५ फॉर इंडियन वुमन इन रिसर्चसाठी निवड झाली. प्रा. मसिरा कुलकर्णी या मूळच्या नगर येथील रहिवासी आहेत.

सहाय्यक प्राध्यापक कुलकर्णी यांच्या शैक्षणिक संशोधनासाठी अढळ वचनबद्धतेची आणि सायबर सिक्युरिटी ॲण्ड डेटा सायन्सच्या विकसित क्षेत्रात त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची ही ओळख आहे. एसीएम–डब्ल्यू ग्रॅज्युएट कोहोर्ट हा एक उपक्रम आहे ज्याचा उद्देश देशभरातील तज्ज्ञांना मार्गदर्शन, नेटवर्किंग आणि ज्ञान–वाटप संधी प्रदान करून संगणकीय संशोधनात भारतीय महिलांना पाठिंबा देणे आणि प्रोत्साहन देणे आहे.

जीएचआरसीईएम पुणे येथील कॅम्पस डायरेक्टर डॉ. आर. डी. खरडकर म्हणाले की, ही कामगिरी आमच्या संस्थेसाठी महत्त्वाची आहे. प्रा. मसिरा कुलकर्णी यांची निवड जीएचआरसीईएममध्ये आम्ही ज्या प्राध्यापकांच्या आणि संशोधन संस्कृतीला प्रोत्साहन देतो त्याची गुणवत्ता दर्शवते. एसीएम–डब्ल्यू ग्रॅड कोहोर्टमधील त्यांचा सहभाग त्यांच्या शैक्षणिक कार्यांना अधिक समृद्ध करेल आणि आमच्या समुदायातील अनेक महिला संशोधकांना प्रेरणा देईल.



राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समितीच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांची निवड झाल्याबद्दल भिंगार अर्बन बँकेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

# भिंगार अर्बन बँकेच्या वतीने जालिंदर बोरुडे यांचा सन्मान

नगर – राष्ट्रीय अंधत्व निवारण समन्वय समितीच्या महाराष्ट्र राज्य अध्यक्षपदी नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांची निवड झाल्याबद्दल भिंगार अर्बन बँकेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

भिंगार अर्बन बँकेच्या सभागृहात झालेल्या कार्यक्रमात बँकेचे चेअरमन अनिल झोडगे व व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी यांनी बोरुडे यांचा सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ संचालक कैलास खरपुडे, आर.डी. मंत्री, एकनाथ जाधव, राजेंद्र पतके, कैलास रासकर, महेश झोडगे, तिलोत्तमा करांडे, सौ. अनिता भुजबळ, कैलास खरपुडे, नामदेव लंगोटे, कैलास दळवी, रुपेश भंडारी, बाळासाहेब गोंधळे, व्यवस्थापक शशीकांत महाजन, सचिन थोरात आदींसह संचालक उपस्थित होते.

# अवतार मेहेरबाबांचे 'सिक्रेट बुक' आजही गूढतेतच

**मेहेरनाथ कलचुरी यांचे प्रतिपादन**

नगर – अवतार मेहेरबाबा समाधी स्थळी सुरू असलेल्या मौन शताब्दी महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी मेहेरबाबांच्या 'सिक्रेट बुक' या रहस्यमय ग्रंथावर प्रकाश टाकणारे डॉ. मेहेरनाथ कलचुरी यांचे प्रवचन झाले. या पुस्तकाचे गूढ आजही अबाधित आहे. हे केवळ शब्दांचे नव्हे तर अध्यात्मिक ऊर्जेचे गूढ आहे, असे त्यांनी भावूक होत सांगितले.



अवतार मेहेरबाबा समाधी स्थळी सुरू असलेल्या मौन शताब्दी महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी मेहेरबाबांच्या 'सिक्रेट बुक' या रहस्यमय ग्रंथावर प्रकाश टाकणारे डॉ. मेहेरनाथ कलचुरी यांचे प्रवचन झाले. यावेळी भक्त उपस्थित होते.

डॉ. मेहेरनाथ कलचुरी हे मेहेरबाबा ट्रस्टचे ज्येष्ठ विश्वस्त असून मेहेरबाबांच्या कार्याचा जवळून अभ्यास करणारे एक थोर व्यक्तिमत्व मानले जाते. त्यांनी सांगितले की, १३ जुलै १९२५ रोजी अवतार मेहेरबाबांनी मौन स्वीकारल्यानंतर अवघ्या तीन दिवसांनी त्यांनी एका झोपडीत 'सिक्रेट बुक' लिहिण्यास प्रारंभ केला. या झोपडीतूनच त्यांच्या मौनाचा आणि विश्वकल्याणाच्या कार्याचा नवा अध्याय सुरु झाला.

पुढे ते म्हणाले, या ग्रंथाचे अनेक पाने आजही दुर्बोध आहेत. त्यातील अनेक प्रती नष्टही झाल्या असाव्यात. पण जे काही शिल्लक आहे, त्यातून मेहेरबाबांच्या अंतरात्म्याचा संवाद आपण अनुभवू शकतो.

मेहेरबाबांनी काही काळानंतर 'टेबल हाऊस' तयार करून घेतले, जिथे त्यांनी लिहिण्यासाठी स्वतंत्र कप्पा बनवला. साडेपाच फूट रूंद आणि साडेसात फूट लांबीच्या या कप्प्यात ते तासन्‌तास ध्यान आणि लेखन करत असत. ११ ऑक्टोबर १९२५ पासून तर ते याच टेबल हाऊसमध्ये झोपू लागले.

हे सिक्रेट बुक म्हणजे कोणत्याही धर्माच्या चौकटीत न बसणारा, पण सर्व धर्मांना एकत्र बांधणारा एक अध्यात्मिक ठेवा आहे, असे डॉ. कलचुरी यांनी नमूद केले. आजही मेहेरबाबांच्या भक्तांमध्ये या ग्रंथाची गूढता आणि अनामिक ओढ कायम आहे.

मेहेराबादमध्ये सध्या हजारो भाविकांनी मेहेरबाबांच्या मौन दिनाच्या निमित्ताने हजेरी लावली आहे. या अध्यात्मिक वातावरणात 'सिक्रेट बुक'वरील चर्चेने महोत्सवाला एक वेगळीच गूढ रंगत दिली.

# दूरदृष्टीचे समाजाभिमुख व्यक्तिमत्त्व : सी.ए.रमेश फिरोदिया



आयुष्यात प्रगती करायची तर शिक्षणाशिवाय तरूणोपाय नाही असे म्हटले जाते. बाल वयात शिक्षणाचे संस्कार झाले पाहिजे. एक उच्च विद्याविभूषित व्यक्ती समाजाला दिशा देवू शकते. नगरचे उद्योजक तथा सी.ए.रमेश फिरोदिया हे अशाच दूरदृष्टीचे व्यक्तिमत्त्व आहे. फिरोदिया यांनी शिक्षणाची गंगोत्री तळागाळापर्यंत पोहचविण्याचे कार्य चालवले आहे. यशस्वी उद्योजक ते समाजकारणाचा महामेरू असा त्यांचा जीवन प्रवास सर्वांसाठी आदर्शवत आहे. त्यांचा वाढदिवस सोमवारी (दि.१४ जुलै) रोजी साजरा होत आहे. यानिमित्त फिरोदिया यांच्या सार्वजनिक जीवनातील वाटचालीचा आढावा घेणारा हा विशेष लेख...

समाजऋणातून उतराई होण्यासाठी जी मंडळी मनापासून प्रयत्न करतात त्यांना समाजाकडूनही तितकच प्रेम मिळतं. साधुसंतांनीही आपल्याला नेहमीच मानव सेवा हीच ईश्वरसेवा आहे, अशी शिकवण दिली आहे. मानवता सर्वोच्च अशी शिकवण देणाऱ्या राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्यावर नितांत श्रध्दा असलेल्या सी.ए. रमेश फिरोदिया यांनी अशाच दिनदुबळ्यांची अविरत सेवा केली आहे. सामाजिक, शिक्षण, आरोग्य, धार्मिक अशा विविध क्षेत्रात त्यांनी भरभरुन योगदान दिले आहे.

संगमनेर तालुक्यातील साकूर हे फिरोदिया यांचे मूळ गाव. जीवनात प्रगती करायची तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे त्यांनी लहान वयात उमजले. त्यामुळे त्यांनी बी.कॉम. ऑनर्स पदवी घेतल्यानंतर सी.ए.अभ्यासक्रमास प्रवेश घेवून अतिशय कठीण अशी ही पदवी मिळवली. १९७० पासून ते एक कुशल सनदी लेखापाल म्हणून प्रॅक्टिस करीत आहेत. आपल्या व्यवसायात यशोशिखरावर पोहचतानाच फिरोदिया यांनी कायम सामाजिक बांधिलकी जपण्यावर भर दिला आहे. शिक्षणामुळे आपण ज्या प्रकारे उत्कर्ष करू शकलो त्याचपध्दतीने इतरांनीही आपली स्वप्ने पूर्ण करावीत यासाठी त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या साकुर गावात शिक्षणाची गंगोत्री आणण्यासाठी महाविद्यालय सुरु केले. साकूर येथील रमेश फिरोदिया आर्टस, सायन्स ण्ड कॉमर्स सिनियर कॉलेज संस्थेचे ते चेअरमन असून या संस्थेत आजमितीस तब्बल ८०० मुले चांगले शिक्षण घेत आहेत.

गरजूंना शिक्षण तसेच आरोग्य सेवेसाठी कार्यरत असलेल्या मुंबईस्थित रमेश फिरोदिया एज्युकेशनल ट्रस्टचे ते विश्वस्त आहेत. नगर जिल्ह्यात दर्जेदार आर्कीटेक्चर महाविद्यालयाची उणीव भासत होती. हे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांना पुणे, मुंबईला जावे लागायचे. हीच गोष्ट लक्षात घेऊन फिरोदिया यांनी नगर – सोलापूर रस्त्यावर वाळूंज शिवारात २०१७ मध्ये प्रशस्त अशा आर्कीटेक्चर महाविद्यालयाची स्थापना केली. नगरच्या आय.एम.एस. संस्थेतील सीडसी संस्थेच्या उभारणीत त्यांनी सिंहाचा वाटा उचलला आहे. नगर शहरातील शिशु संगोपन संस्थेच्या शाळेची इमारत नव्याने बांधून देत त्यांनी सविता रमेश फिरोदिया प्रशाला हे नाव दिले. पाली राजस्थान येथील श्री रुपमुनि रजत गुरु सेवा समिती तसेच चितोडगड आदेश्वर पार्श्व सेवा ट्रस्टचे विश्वस्त म्हणूनही ते भरीव योगदान देत आहेत.

जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवाकार्यात त्यांनी नेहमीच सक्रिय योगदान दिले आहे. नगरमधील पांजरापोळ गोरक्षण संस्थेचे ते विश्वस्त व उपाध्यक्ष आहेत. याशिवाय नाशिक येथील मातोश्री वृध्दाश्रमाचेही ते विश्वस्त आहेत. धार्मिक कार्यातही त्यांचा नेहमीच सक्रिय सहभाग असतो. नगरचे धार्मिक परीक्षा बोर्ड व मुंबईतील महावीर एज्युकेशन वसतीगृहाचे तसेच मुंबईतील आत्मा आनंद संघाचे ते विश्वस्त असून नगरमधील ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. सामाजिक क्षेत्रातील सातत्यपूर्ण योगदानामुळे फिरोदिया यांची अखिल भारतीय जैन कॉन्फरन्सच्या विश्वस्तपदीही निवड झाली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेवून परळीतील (जि.बीड) मारवाडी युवा मंचने स्व.सुवालालजी वाकेकर (ललवाणी) यांच्या स्मृतीप्रित्यर्थ फिरोदिया यांना राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्काराने गौरविले आहे. जितो अहमदनगरचा जितो जीवन गौरव पुरस्कार त्यांना मिळाला आहे. करोनाकाळात मानवतेवर आलेले संकट पाहून त्यांनी अतिशय मोलाची मदत केली. जिथे जिथे गरज लागेल तिथे ते धावून गेले. सी. ए. असोसिएशन भवनात प्रशस्त असे ऑडिटेरियम त्यांनी साकारले आहे. कोल्हार येथील कैवल्यधाम येथेही ते सक्रिय मदत करीत असतात.

वयाने ज्येष्ठ असले तरी त्यांचे विचार तरुण आहेत. नव्या पिढीला काय अपेक्षित आहे याची त्यांना जाणीव आहे. मुलांना योग्य दिशा व मार्गदर्शन मिळाले तर ते आपली स्वप्ने नक्कीच साकार करतात यावर त्यांचा ठाम विश्वास आहे. त्यांच्या सान्निध्यात नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात. आपली अनुभवाची सर्व शिदोरी ते रिती करतात. यातून प्रत्येकाला नवीन प्रेरणा प्राप्त होते. फिरोदिया यांना वाढदिवसानिमित्त निरोगी दीर्घायुष्य लाभो याच शुभेच्छा!!!

**– संतोष गांधी (गांधी कुरिअर), माजी चेअरमन तथा विद्यमान संचालक, सहकारमहर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्था, नगर**



श्रीमती ॲबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल भिंगार या ठिकाणी गुरुपौर्णिमेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित शिक्षक व विद्यार्थी.

# मानवी जीवनात गुरूला अनन्यसाधारण महत्त्व

**प्रमोद मुळे यांचे प्रतिपादन; श्रीमती ॲबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल, भिंगार विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी**

भिंगार – आपल्या गुरूंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून समाजात आपलं स्थान निर्माण करावे, असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद जनकल्याण प्रबोधिनी ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष प्रमोद मुळे यांनी केले.

श्रीमती ॲबट मायादेवी गुरुदित्ताशाह हायस्कूल भिंगार या ठिकाणी गुरुपौर्णिमेचे आयोजन करण्यात आलेल्या प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद तोरणे होते. प्रारंभि प्रमोद मुळे, गणेश दाणी, रमेश वराडे, सुनील तरवडे, श्रीपाद मुंगी, शिवप्रसाद काळे, राम घुले, विद्यालयाचे प्राचार्य तथा उत्तर विभागीय सहाय्यक अधिकारी प्रमोद तोरणे, मुख्याध्यापक नारायण अनभुले पर्यवेक्षिका कविता शिंदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन आणि दीप प्रज्वलन झाले.

आमदार आशुतोष काळे यांचे नगर कार्यालय प्रमुख गणेश दाणी यांनी विद्यार्थ्यांना आपला देश, आई–वडील, गुरु यांना कधीही विसरू नये तरच जीवनाला अर्थ आहे हे समजून सांगितले.

स्वामी विवेकानंद ट्रस्ट भिंगार यांच्या वतीने गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले.

प्रास्ताविकामध्ये विद्यालयाचे प्राचार्य प्रमोद तोरणे यांनी विद्यार्थ्यांकडून गुरुदक्षिणा म्हणून जीवनात कधीही व्यसन करणार नाही ही शपथ घेतली. यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेनिमित्त भाषणे करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या भाषणानंतर शाळेच्या आवारात वृक्षारोपण झाले.

सूत्रसंचालन पद्मजा सुरकुटला यांनी केले. गणपत करवते यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.



डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात महिलांसाठी आरोग्य आहार आणि योग या विषयावर कार्यशाळेत बोलताना डॉ.हेमा सेलोत समवेत विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षक वृंद.(छाया – विजय मते)

# योगा, आहार आणि नैसर्गिक जीवनशैली ही सशक्त आरोग्याची गुरुकिल्ली

**डॉ.हेमा सेलोत यांचे प्रतिपादन; डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत महिलांसाठी आरोग्य, आहार आणि योग कार्यशाळा**

नगर – आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत महिलांना स्वतःच्या आरोग्याकडे पाहण्याचा वेळच उरत नाही. परंतु घर, नोकरी, जबाबदार्या सांभाळताना महिलांनी आपले मानसिक आणि शारीरिक आरोग्य सक्षम ठेवणे अत्यावश्यक आहे. महिलांमध्ये थायरॉइड, हॉर्मोनल असंतुलन, ॲनिमिया, हाडांच्या तक्रारी यासारख्या समस्या वाढत आहेत, याचे मूळ कारण चुकीची जीवनशैली व असंतुलित आहार आहे. दररोजच्या आहारात हिरव्या भाज्या, मोड आलेले कडधान्य, फळे, भरपूर पाणी आणि योग्य वेळेवर झोप याचा समावेश करून शरीरातील नैसर्गिक संतुलन राखता येते, असे प्रतिपादन निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ.हेमा सेलोत यांनी केले

डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात महिला व विद्यार्थिनींसाठी योगा, आहार व आरोग्य या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे उद्घाटन निसर्गोपचार तज्ज्ञ डॉ.हेमा सेलोत, झुंबा व योगा तज्ज्ञ सौ.सुरुची धोंडे, आरोग्यवर्धिनी विद्यार्थिनी दिक्षीका कराचीवाला यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. महाविद्यालयाच्या जिमखाना हॉलमध्ये महिला सशक्तीकरण व सबलीकरण यावर आधारित योगा व झुंबा प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. विद्यार्थिनींनी सहभाग घेत कार्यक्रमात रंगत आणली. त्यानंतर प्रमुख वक्त्या डॉ.हेमा सेलोत यांनी ‘आधुनिक काळातील महिलांचे आरोग्य व आहार’ या विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

पुढे बोलताना डॉ.सेलोत यांनी नमूद केले की, योगा आणि ध्यान ही आपल्या संस्कृतीची अमूल्य देणगी आहे. यामध्ये केवळ शरीर नव्हे तर मन, भावना आणि ऊर्जा या सर्वांचे शुद्धीकरण होते. दिवसाची सुरुवात १५ मिनिटे प्राणायाम व सूर्यनमस्काराने केल्यास मानसिक शांती व ऊर्जा टिकून राहते. महिलांनी स्वतःला ‘प्राथमिकता’ देण्याची सवय लावली पाहिजे. ‘मी आनंदी तर माझे कुटुंबही आनंदी’ ही भावना ठेवून शरीराची नियमित निगा राखणे, हे आत्मभान जागृत करण्याचे पहिले पाऊल आहे.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा.डॉ. सत्यवती मगर यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. प्रियांका जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

या उपक्रमासाठी संस्थेचे संचालक सुनील कल्हापुरे व प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. महिला प्राध्यापक व विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लाभली.

# पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचा ‘नगरचे जिगर’ संस्थेकडून गौरव



पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचा ‘नगरचे जिगर’ संस्थेकडून आमदार संग्राम जगताप, व्याख्याते आणि इतिहास अभ्यासक केतन पुरी, ॲड.रविंद्र शितोळे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याप्रसंगी उपाध्यक्ष श्रीनिवास बुरगुल, वरद लक्षेट्टी आदी. (छाया – शुभम येमुल)

नगर – पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टला ‘नगरचे जिगर’ आणि छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला. माऊली सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात आमदार संग्राम जगताप, व्याख्याते आणि इतिहास अभ्यासक केतन पुरी आणि ॲड. रविंद्र शितोळे यांच्या हस्ते ट्रस्टचे उपाध्यक्ष श्रीनिवास बुरगुल व वरद लक्षेट्टी यांनी हा सन्मान स्वीकारला.

संस्थेचे राजेंद्र बुलबुले यांनी सांगितले की, पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टने सामाजिक जाणिवेतून केलेले कार्य हे समाजासाठी दीपस्तंभासारखे आहे. कोविड काळात गरजू, एकटे, आजारी, वृद्ध, विधवा महिलांना सलग तीस दिवस जेवण पुरविण्याचे केलेले कार्य, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश, वह्या, दप्तर यांचे वाटप, तसेच अनाथ व निराधार कुटुंबांना वैद्यकीय मदत यांसारख्या उपक्रमातून या संस्थेने आपल्या कार्याचा ठसा उमटवला आहे. या कार्याची दखल घेवुन त्यांचा सन्मान करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

सन्मान स्वीकारताना संस्थेचे उपाध्यक्ष श्रीनिवास बुरगुल यांनी सांगितले की, हा सन्मान आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. आम्ही फक्त आमचे कर्तव्य पार पाडत आहोत, पण समाजाने आणि ’नगरचे जिगर’ सारख्या संस्थेने आमच्या कार्याची दखल घेतली, हे अधिक जबाबदारीची जाणीव करून देते. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत मदतीचा हात पोचवण्याचा आमचा प्रयत्न पुढेही सुरूच राहील. आम्ही कुठलाही गाजावाजा न करता केवळ सेवाभावातून काम करत आलो आहोत आणि याच तत्त्वावर आम्ही आमचे सामाजिक कार्य विस्तारत राहू.

सूत्रसंचालन घुले सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन संस्थेचे प्रविण गोधडे यांनी केले.

# शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी शहरात नियोजन बैठकित जिल्ह्यातील ५६५ शिक्षकांची उपस्थिती

**तालुका क्रीडा प्रमुखांसह क्रीडा शिक्षकांचा सन्मान**

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर व जिल्हा क्रीडा परिषद यांच्या वतीने आयोजित होणाऱ्या शालेय क्रीडा स्पर्धा २०२५–२६ आयोजन नियोजन बैठक आणि एक दिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली. शहरातील न्यू आर्टस कॉमर्स ॲण्ड सायन्स महाविद्यालय येथील राजश्री शाहू सभागृहात झालेल्या या बैठकीला जिल्ह्यातील ५६५ क्रीडा शिक्षकांनी उपस्थिती दर्शवली. प्रथमच अहिल्यानगर महानगरपालिका व १४ तालुक्यातील सर्व क्रीडा शिक्षकांची एकत्रित बैठक घेण्यात आली होती.

राष्ट्रगीत व दीपप्रज्वलनाने या बैठकीचे प्रारंभ झाले. यावेळी प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, संस्थेचे सहसचिव जयंत वाघ, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रा. सुनील जाधव, मनीषा पुंडे, अंजली देवकर, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे चेअरमन आप्पासाहेब शिंदे, प्राचार्य विजयकुमार पोकळे, क्रीडा शिक्षक महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र कोतकर, जिल्हाध्यक्ष नंदकुमार शितोळे, प्रा. संजय साठे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, क्रीडा मार्गदर्शक प्रवीण कोंढवळे, विशाल गर्जे, संतोष वाबळे, महेंद्र हिंगे, बापूराव होळकर, घनश्याम सानप, दिलीप काटे, सुधाकर सुंभे, संदेश भागवत, आकाश नढे यांच्यासह १४ तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी व विस्तार अधिकारी उपस्थित होते.





शालेय क्रीडा स्पर्धा आयोजनासाठी शहरात नियोजन बैठकीचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड आदी. शेजारील छायाचित्रात उपस्थित असलेले क्रीडा शिक्षक.

प्रारंभी क्रिकेट, बॉक्सिंग आदी खेळ संघटनांचे अध्यक्ष व क्रीडा क्षेत्राला पाठबळ देणारे माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांना बैठकीत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. रेसिडेन्शियल हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले.

माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड यांनी खेळामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास होत असतो. याकरिता प्रत्येक शाळेने जास्तीत जास्त खेळाडूंना शालेय स्पर्धांमध्ये सहभागी होण्याकरिता प्रोत्साहित द्यावे. सर्व शाळांनी क्रीडा स्पर्धामध्ये आपला सहभाग नोंदविण्याचे त्यांनी आवाहन केले.

प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांनी दरवर्षी जिल्हा परिषद मधील जास्तीत जास्त शाळा शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभागी व्हाव्या, यासाठी सर्व गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख यांना सूचना केल्या आहेत. प्रथमच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व प्राथमिक शिक्षण विभाग यांच्या वतीने जिल्ह्यातील सर्व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय स्पर्धेमध्ये सहभागी करण्याकरिता शिक्षण विभाग व क्रीडा विभाग यांची एकत्रित बैठकीचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याप्रसंगी सन २०२४–२५ मधील शालेय क्रीडा स्पर्धाचे तालुका स्तरावर यशस्वी आयोजन केल्याबद्दल सर्व तालुक्यांचे तालुका क्रीडा प्रमुख व जिल्ह्यातील पर्यवेक्षक व मुख्याध्यापक पदावर पदोन्नती झालेल्या क्रीडा शिक्षकांचा गौरव करण्यात आला. यावेळी क्रीडा शिक्षकांचा देखील सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

दुपारच्या सत्रात शालेय क्रीडा स्पर्धामध्ये सहभागाकरिता वेबसाईटद्वारे शाळा रजिस्ट्रेशन करणे व प्राथमिक प्रवेशिका भरणे याचे प्रशिक्षण क्लिक स्पोर्ट्सचे संचालक प्रवीण बानवलीकर यांनी दिले. जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी २०२५–२६ मध्ये आयोजित करावयाचे ९३ खेळ प्रकारांबद्दल माहिती दिली. तसेच तालुकास्तरावरील १० खेळ प्रकारांचे आयोजन करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. मिशन लक्ष्यवेध अंतर्गत राज्यातील खाजगी अकादमीचे सक्षमीकरण करण्यासाठी आर्थिक सहाय्य योजनेची सविस्तर माहिती दिली. तसेच क्रीडा विभागाचे विविध उपक्रम, अनुदान योजनेबाबत मार्गदर्शन केले.

याप्रसंगी विशेष प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या क्रीडा शिक्षकांचा देखील सत्कार करण्यात आला. क्रीडा शिक्षकांनी तंदुरुस्त राहून जास्तीत जास्त खेळाडू निर्माण करावेत, याकरिता त्यांनी स्वतःचे आरोग्य देखील जपावे याकरिता सर्वांची आरोग्य तपासणी करण्याचा नवीन उपक्रम यावर्षी प्रथमच जिल्ह्यात राबविण्यात आला. सकाळी सुरु झालेली बैठक संध्याकाळपर्यंत रंगली होती.

सूत्रसंचालन सचिन गावडे यांनी केले. भाऊराव वीर यांनी आभार मानले.

# महावीरनगर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



महावीरनगर येथे झालेल्या सत्कार सोहळ्यात गुणवंताचा सत्कार करताना अनिल कटारिया. समवेत शरद गोखले, अविनाश जोशी. बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुप तर्फे गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी ग्रुपचे अध्यक्ष शरद गोखले, उद्योजक अनिल कटारिया, अविनाश जोशी यांच्यासह ग्रुपचे सदस्य.

नगर – बालिकाश्रम रोडवरील ओम सुप्रभात ग्रुपतर्फे महावीरनगर येथील जैन स्थानक सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष अनिल कटारिया, हिंद सेवा मंडळाचे उपाध्यक्ष तथा ग्रुपचे अध्यक्ष शरद गोखले, संस्थापक अध्यक्ष अविनाश जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. अभियांत्रिकीच्या सीईटीमध्ये जिल्ह्यात प्रथम आलेला सार्थक विठ्ठलराव देशमुख, सीईटी परीक्षेत अव्वल गुण मिळवलेला सोहम रमेश बोरुडे, न्यू आर्ट्स म हाविद्यालयामध्ये बीसीए विभागात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेला गिरीश मधुकर साबळे आणि विविध नाट्य स्पर्धेमध्ये नैपुण्य मिळवलेली तनुष्का देशमुख यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

यावेळी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष अनिल कटारिया म्हणाले, आई–वडिलांनी मुलांची गुणवत्ता वाढवण्यासाठी मेहनत घेतली. विद्यार्थ्यांनी मन लावून अभ्यास केला आणि विविध परीक्षेत प्राविण्य मिळवले. यापुढेही त्यांनी चांगले यश मिळवून समाजाची आणि देशाची सेवा करावी.

शरद गोखले म्हणाले, विद्यार्थ्यांनी पुस्तकांशी मैत्री करावी यातूनच त्यांचे उज्वल भवितव्य घडते.

अविनाश जोशी म्हणाले, ओम सुप्रभात ग्रुप आरोग्याच्या जागृतीबरोबरच समाजातील गरजूंना मदतीचा हात पुढे करतो. गुणवंत विद्यार्थ्यांना यापुढेही अभ्यास करण्याची प्रेरणा मिळावी म्हणून या सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कुठल्याही अडचणीचा बाऊ न करता विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश कौतुकास्पद आहे.

ग्रुपचे सदस्य ॲड. अशोक गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. पत्रकार सुदाम देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी पंढरपूरची वारी पूर्ण केल्याबद्दल निवृत्त मुख्याध्यापक संजय मुदगल यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी गुणे आयुर्वेद महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य डॉ. अंजली देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास ग्रुपचे सदस्य डॉ. अण्णासाहेब देशमुख, ॲड. रखमाजी सुंबे, प्रा. गोविंद खेर्डेकर, माजी मुख्याध्यापक मधुकर साबळे, रमेश बोरुडे, विठ्ठल देशमुख, नीता गायकवाड, साधिका देशमुख, अनिता बोरुडे, शांता साबळे, प्राची देशमुख आदी उपस्थित होते.



एकलव्य तायक्वांदो अकॅडमीचे जिल्हास्तरीय स्पर्धेत १९ खेळाडूची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

## ‘एकलव्य तायक्वांदो’च्या १९ खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

नगर – अहिल्यानगर शहर जिल्हास्तरीय सब ज्युनिअर व सिनियर तायक्वांदो स्पर्धा नुकत्याच आनंद विद्यालय गुलमोहर रोड अहिल्यानगर येथे झाल्या.

तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशन आयोजित व महाराष्ट्र तायक्वांदो असोसिएशनच्या अंतर्गत व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनच्या मान्यतेने इंडिया तायक्वांदोच्या मान्यतेने व जागतिक महासंघाच्या नियमाप्रमाणे झाल्या. एकलव्य तायक्वांदो अॅकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत १९ सुवर्ण, १० रौप्य, ५ कांस्य एकूण ३३ पदकांची कमाई केली.

सुवर्णपदकासाठी कार्तिकी वंजारे, शौर्य मोटे, शिवांश बिचीतकर, हृदया दहिफळे, स्नेहल देशमुख, शिवराज शेलार, चैतन्य कोतकर, आदित्य जाधव, देव सत्रे, संग्राम सत्रे, नाजिम पठाण, वेदांत राहिंज, अवधूत गुंजाळ, पृथ्वीराज पवार, श्वेता काळे, गौरी दळवी, कार्तिकी कोतकर, आसावरी डोले, अमित लोंढे मानकरी ठरले.

रौप्य पदक विजेते खेळाडू मानकरी श्रीराम कुलकर्णी, अवधूत जाधव, अनुष्का जाधव, तेजप्रताप नाळे, भावना लष्करे, प्रांजल राऊत, प्रज्वल राऊत, श्रेयस तागड, विहान भिंगारदिवे, भाग्यश्री वाळके.

कांस्यपदक विजेते खेळाडू मानकरी रुद्र वंजारे, ऋतिक काळे, चैतन्य गुंजाळ, गौरव हराळ, ज्ञानेश्वर शिंदे या खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक गणेश वंजारे, योगेश बिचीतकर, सचिन मरकड, मंगेश आहेर, ग्रँडमास्टर अल्ताफ खान यांचे मार्गदर्शन लाभले.



डॉ. शरद कोलते स्कूल येथे शालेय साहित्य व गणवेश वाटप करण्यात आले.

# गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हि चांगले नागरिक घडवण्याची पहिली पायरी

**प्रा. विजय शिंदे यांचे प्रतिपादन, डॉ. शरद कोलते स्कूल येथे शालेय साहित्य व गणवेश वाटप**

नगर – गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हि चांगले नागरिक घडवण्याची पहिली पायरी असल्याचे प्रतिपादन प्रा. विजय शिंदे यांनी केले. पारगाव येथील डॉ. शरद कोलते इंग्लिश मिडीयम स्कूल मध्ये त्यांच्या हस्ते शालेय साहित्य व गणवेश वाटप कार्यक्रम करण्यात आला. यावेळी शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

पारगाव येथील शाळेच्या माध्यमातून येथील परीसरातील विद्यार्थी, शेतकरी, युवक, महिला यांना सातत्याने मार्गदर्शन व होईल ती मदत केली जाते. इंग्रजी माध्यमाची शाळा असून देखील येथे भारतीय संस्कृती जपली जाते. आषाढी एकादशीच्या दिवशी प्रभातफेरी काढून गावातील नागरिकांना पर्यावरण संवर्धनासाठी उद्युक्त केले जाते. अशा उपक्रमातून विद्यार्थ्यावर संस्कार केल्यामुळे चांगले नागरिक घडण्यास मदत होईल अशी आमची धारणा आहे असे देखील यावेळी ते म्हणाले.

विद्यार्थांना शाळेच्या वतीने सर्व शालेय साहित्य व गणवेश दिले जातात. कार्यक्रमाचे नियोजन ईश्वर तनपुरे, कीर्ती मगर, निकिता तनपुरे व प्रिती कुमटकर यांनी केले.

# जागतिक झूनोसेस दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगरतर्फे गोशाळेत चारा, औषध वाटप व गाईंना रेबीज प्रतिबंधक लसीकरण



जागतिक झूनोसेस दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगरतर्फे अरुणोदय गोशाळेत चारा, औषध वाटप करताना सुनील कटारिया, सचिव अमर गुरव आदी. (छाया – लहू दळवी)

नगर – जागतिक झूनोसेस दिननिमित्ताने रोटरी क्लब ऑफ अहमदनगर यांच्या वतीने अरुणोदय गोशाळेत गाईंसाठी रेबीज प्रतिबंधक लसीकरण, चारा व औषध वाटप यासारखा उपक्रम आयोजित करण्यात आला. झूनोसेस म्हणजे प्राण्यांमधून माणसांत होणारे संसर्गजन्य आजार. त्यापैकी ‘रेबीज’ हा एक अत्यंत घातक आजार असून, त्यावर नियंत्रणासाठी गाईंसह इतर प्राण्यांचे लसीकरण अत्यावश्यक आहे. विशेष म्हणजे या दिवशीच शास्त्रज्ञ डॉ. लुई पाश्चर यांच्या नेतृत्वाखाली तयार झालेल्या प्रथम रेबीज प्रतिबंधक लसीचा ऐतिहासिक संदर्भही जोडलेला आहे. याच वैज्ञानिक परंपरेला पुढे नेत, रोटरी क्लबने समाजजागृतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. रोटरी क्लब ऑफ अहमदनगरच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा नुकताच पदग्रहण समारंभ पार पडला असून, त्यानंतरचा हा पहिलाच सामाजिक उपक्रम त्यांनी गोसेवेच्या माध्यमातून राबवला आहे.

अध्यक्ष सुनील कटारिया यांनी सांगितले की, सामाजिक बांधिलकी जपत पशुसंवर्धन, आरोग्य व जनजागृती हे आमचे कार्यक्षमतेचे केंद्रबिंदू राहतील. रोटरी क्लबचा झूनोसेस दिन साजरा करण्यामागचा उद्देश केवळ गोसेवा नव्हे, तर मानवाच्या आरोग्यासाठी प्राण्यांची काळजी घेणे ही जबाबदारी सर्वांनी स्वीकारावी, हा संदेश देणे हा होता. हा उपक्रम पर्यावरण, आरोग्य, व सामाजिक सहजीवन यांची सांगड घालणारा ठरला असून, अन्य संस्थांसाठीही तो एक प्रेरणास्रोत बनला आहे, असे ते म्हणाले.

जागतिक झूनोसेस दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ अहमदनगर तर्फे अरुणोदय गोशाळेत चारा, औषध वाटप करताना सुनील कटारिया, सचिव अमर गुरव, राजेंद्र बेंद्रे, प्रसन्न खाजगीवाले, मनीष बोरा, दत्ता दीक्षित, राजेश परदेशी, निलेश मेहेर, सुनील मुथा, संजय मुनोत, वसंत मुनोत, विनोद भंडारी, मनोज बाफना, चिराग शहा, डॉ. बाबासाहेब कडूस, डॉ. जयदीप खेंडके, मनीष फुलडाहळे आदी उपस्थित होते.

यावेळी सुमारे पाचशेहून अधिक गाईंना रेबीज प्रतिबंधक लसीकरण, कृमिनाशक औषधोपचार, तसेच पौष्टिक चाऱ्याचे वाटप करण्यात आले. डॉ. जयदीप खेडके व डॉ. बाबासाहेब कडूस यांनी गाईंची तपासणी करत रेबीज प्रतिबंधक लस दिली व जनावरांच्या आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# अर्थजगत



फेब्रुवारीपासून जूनपर्यंत मध्यवर्ती बँकेने तीन वेळा रेपो दरात कपात केली आहे. याचा अर्थ बँकाही आता व्याजदर कमी करतील. बँकांनी फिक्स्ड डिपॉझिटवरील व्याजदर तर आधीच कमी करायला सुरुवात केली आहे, तसेच बचत खात्यातील ठेवांवरील व्याजदरही कमी केले आहेत. देशातील सर्वात मोठ्या बँकेने, म्हणजे स्टेट बँक ऑफ इंडियाने, बचत ठेवांवरील व्याजदर कमी करून ते २.५ टक्के केले आहे, तर एचडीएफसी आणि आयसीआयसीआय या बँकांनीही तो दर कमी करून २.७५ टक्के केला आहे. बँकांनी सर्व कालावधीसाठीच्या फिक्स्ड डिपॉझिटवरील दरात २० बेसिस पॉईंट्स म्हणजेच ०.२० टक्क्यांची कपात केली आहे.



## गुंतवणुकीचा प्रवास सुरू करताना...

**इक्विटी मार्केट हे हळूहळू उच्च परतावा मिळविण्याचे ठिकाण आहे. लोक जलद नफा मिळविण्यासाठी इक्विटी मार्केटमध्ये गुंतवणूक करतात आणि कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत बाजाराला दोष देतात. मालमत्ता वर्ग म्हणून इक्विटी हा दीर्घ कालावधीत परतावा मिळविण्याचा एक उत्तम मार्ग आहे.**

आजकाल गुंतवणुकीसाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. कधीकधी ते समजणे खूप कठीण असते. तुम्ही ज्या उत्पादनांमध्ये गुंतवणूक करता ते जर तुमची ध्येय पूर्ण करतात, तर मग गुंतागुंतीच्या उत्पादनांच्या मागे का धावायचे? मूलभूत उत्पादने किंवा तुम्हाला समजणारी उत्पादने निवडा. दोन्ही उत्पादनांमध्ये, अखेर परतावा कमी-अधिक प्रमाणात सारखाच असतो. आर्थिक गुंतवणुकीचा प्रवास सुरू करताना खालील गोष्टी नेहमी लक्षात ठेवाव्यात.

गुंतवणुकीस लवकर सुरुवात करा-

जितक्या लवकर सुरुवात कराल तितकी मोठी रक्कम जमा होण्याची शक्यता जास्त असते. उदाहरणार्थ, जर तुम्ही २५ वर्षांसाठी १० टक्के परतावा देऊन मासिक ५०००/- रुपये गुंतवले तर मुदतीच्या शेवटी तुमचे ६६.३४ लाख रुपये जमा झालेले असतील. जर तुम्ही ही गुंतवणूक ३ वर्षांनी पुढे ढकलली तर जमा होणारा निधी फक्त ४७.६५ लाख रुपये असेल.

बाजारातील परिस्थितीवर नाही तर ध्येयांवर लक्ष केंद्रित करावे. एखाद्याने त्यांच्या वैयक्तिक परिस्थितीनुसार गुंतवणूक करावी आणि कळपाच्या मानसिकतेचे अनुकरण करू नये. बाजाराच्या वेळेपेक्षा बाजारात घालवलेला वेळ हा जास्त महत्त्वाचा आहे. बाजारातील चढ-उतार निश्चित करणे आपल्यासाठी अशक्य आहे आणि म्हणूनच आपला परतावा गुंतवणुकीतून प्रवेश किंवा निर्गमन करण्यापेक्षा आपण किती वेळ गुंतवणूक करतो यावर अवलंबून असेल. पोर्टफोलिओच्या हालचालींपेक्षा आपले वर्तन बाजारातून मिळणारे दीर्घकालीन परतावे ठरवेल.



**फोरम शाह**
(लेखिका प्रमाणित आर्थिक नियोजक आहेत.)

जर तुम्हाला संपत्तीची बाग हवी असेल, तर ती कशी जोपासायची ते शिका. बऱ्याचदा लोक काही उत्पादनांमध्ये गुंतवणूक करतात आणि ते विसरून जातात. काही प्रकरणांमध्ये ते फायदेशीर ठरू शकते, परंतु काही प्रकरणांमध्ये ते गुंतवणूकदार संरक्षण निधीमध्ये जातात. त्यामुळे नियमितपणे तुमच्या आर्थिक बाबींचा आढावा घ्या. पत्ता, नामांकने, संपर्क तपशील, बँक तपशील इत्यादी अपडेट करा. यामुळे तुम्हाला मुदतपूर्तीनंतर किंवा पैशांची आवश्यकता असताना त्रास सहन करावा लागणार नाही याची खात्री होते.

वृद्धावस्थेत किंवा अन्य कोणत्याही कारणाने बँकेत जमा केलेल्या पैशांच्या व्याजावर आपला खर्च चालवतात त्यांच्यासाठी ही परिस्थिती चिंतेची आहे. कारण ही कोट्यवधी मंडळी शेअर बाजाराच्या चढ-उतारांपासून दूर राहू इच्छितात आणि फिक्स्ड डिपॉझिटमध्ये गुंतवणूक करत राहतात. ही गुंतवणूक त्यांना आर्थिक आधार देते. कारण ती त्यांच्या पैशांचे मूल्य वाढवते. मुळात हे उत्पन्नाचे एक मोठे स्रोत राहिले आहे.

कधी काळी बँका एफडीवर १२ टक्क्यांपर्यंत व्याज देत असत, पण आता हा दर सात टक्क्यांखाली घसरला आहे. महागाई आणि जीवनमान वाढल्यामुळे ही रक्कम इतकी कमी झाली आहे की त्यावर जगणे शक्य नाही. वरिष्ठ नागरिक आणि इतर असे अनेक लोक शेअर बाजारापासून दूर राहू इच्छितात, कारण तेथील अनिश्चिततेमुळे त्यांना भीती वाटते. तिथे निश्चित उत्पन्न नाही, ना कुठली हमी. डिबेंचर आणि बाँडसारख्या पर्यायातही फारशी आकर्षक परिस्थिती नाही. तर अशा वेळी काय करावे?

अशा परिस्थितीत, पोस्ट ऑफिसच्या बचत योजनांकडे वळणे हे शहाणपणाचे ठरेल. या योजनांमध्ये अल्प उत्पन्न गटातील कोट्यवधी लोकांनी गुंतवणूक केलेली आहे आणि आजही चांगले परतावे मिळताहेत. यामधील सर्वात यशस्वी योजना म्हणजे सार्वजनिक भविष्य निर्वाह निधी म्हणजेच पीपीएफ. यामध्ये कोट्यवधी लोकांनी गुंतवणूक केलेली आहे. यात चांगले व्याजदर तर आहेच, शिवाय दीड लाख रुपये पर्यंत गुंतवणुकीवर कर सवलत मिळते

## वळूया पोस्टाकडे...



आणि परताव्यावरसुद्धा एक मर्यादेपर्यंत कर माफी मिळते.

पोस्ट ऑफिसच्या इतर अनेक योजनाही चांगले परतावे देतात. यामधील आणखी एक उत्कृष्ट योजना म्हणजे पोस्ट ऑफिस नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट योजना म्हणजेच एनएससी. या योजनेत ७.७ टक्के व्याजदराने परतावा मिळतो. जर आपण या योजनेत पाच लाख रुपये गुंतवले, तर मुदतपूर्तीच्या वेळी एकूण ७,२४,५१७ रुपये मिळतील.

याचप्रमाणे आरडी, म्हणजेच आवर्ती ठेव योजनेत एक निश्चित कालावधीसाठी दरमहा एक ठराविक रक्कम जमा करून व्याज मिळवले जाते. यात ६.७ टक्क्यांच्या दराने परतावा मिळतो. यामध्ये व्याज चक्रवाढ पद्धतीने मिळते, जे फार थोड्या योजनांमध्ये असते.

पोस्ट ऑफिसची आणखी एक उत्तम योजना म्हणजे सीनियर सिटिझन सेव्हिंग्ज स्कीम. या योजनेत ८.२ टक्के व्याजदराने उत्पन्न मिळते. या योजनेत पाच वर्षांसाठी पाच लाख रुपये गुंतवले, तर मुदतपूर्तीच्या वेळी एकूण ७,०५,००० रुपये मिळतील, म्हणजेच २.०५ लाख रुपयांचा नफा होईल.

पोस्ट ऑफिसची मुदत ठेव योजनाही आहे. यातही चांगला परतावा मिळतो आणि ही योजना खूप लोकप्रिय आहे. पाच वर्षांच्या कालावधीच्या एफडीमध्ये ७.५ टक्के व्याजदराने परतावा मिळतो.

आणखी एक महत्त्वाची योजना आहे सुकन्या समृद्धी योजना. प्रत्यक्षात मुलींच्या शिक्षण आणि विवाहाचा विचार करून ही योजना तयार करण्यात आली आहे. ही निश्चित उत्पन्न देणाऱ्या योजनांमध्ये सर्वात वर आहे आणि दहा वर्षांखालील वयाच्या मुलींसाठी ही योजना लागू आहे. यामध्ये किमान २५० रुपये आणि जास्तीत जास्त १.५ लाख रुपये दरवर्षी जमा करता येतात. या योजनेत ८.२ टक्के दराने वार्षिक व्याज मिळते. हेही चक्रवाढ व्याज आहे.

किसान विकास पत्र योजना ही पैसे दुप्पट करणारी पोस्ट ऑफिसची योजना आहे. ही योजना चांगल्या परताव्याची हमी देते. या योजनेअंतर्गत गुंतवलेला पैसा ११५ महिन्यांमध्ये म्हणजेच नऊ वर्षे सात महिन्यांमध्ये दुप्पट होतो. त्यामुळे, बँकांच्या झगमगाटापासून दूर पोस्ट ऑफिसच्या आश्रयाला जाणे आणि त्यांच्या योजनांचा लाभ घेणे हेच शहाणपणाचे ठरेल.

## बिटकॉईन आणि आयटीआर

बिटकॉईन हे ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित एक आंतरराष्ट्रीय आभासी चलन आहे. हे कोणत्याही बँक किंवा अधिकृत सरकारी संस्थेच्या नियंत्रणाखाली नसते. बिटकॉईन व्यतिरिक्त लाईटकॉईन, इथेरियम, रिपल, झी-कॅश यांसारखी इतरही अनेक क्रिप्टोचलने अस्तित्वात आहेत. क्रिप्टोचलन हे डिजिटल चलन, पर्यायी चलन आणि आभासी चलन यांच्याच श्रेणीत मोडते.

भारतीय रिझर्व्ह बँक किंवा कोणतीही सरकारी संस्था हे चलन वैध मानत नाही. अर्थ मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की बिटकॉईनला कायदेशीर निविदा म्हणून मान्यता नाही. त्यामुळे हे चलन मालमत्ता किंवा डिजिटल मालमत्ता या स्वरूपातच गणले जाते.भारतात बिटकॉईनसह सर्व क्रिप्टोचलनांना आभासी डिजिटल मालमत्ता (व्हर्च्युअल डिजिटल असेट्स) म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे. त्यानुसार क्रिप्टोचलनाच्या विक्रीवेळी एकसंध ३० टक्के दराने कर आकारला जातो. केवळ खरेदीचा खर्च वगळता इतर कोणताही खर्च वजावटीस पात्र नसतो. झालेला तोटा अन्य उत्पन्नाशी समायोजित करता येत नाही. तसेच पुढील वर्षांसाठी पुढेही नेता येत नाही

क्रिप्टोचलन भेट म्हणून दिल्यास, प्राप्तकर्त्याला कर द्यावा लागतो. १ जुलै २०२२ पासून प्रत्येक विक्री व्यवहारावर एक टक्के टीडीएस लागू झाला आहे

क्रिप्टोमायनिंग म्हणजे संगणकीय क्षमता वापरून गुंतागुंतीचे गणिती प्रश्न सोडविणे आणि त्याद्वारे नवीन बिटकॉइन्स निर्माण करणे. हे उत्पन्न थेट ३० टक्के दराने करपात्र ठरते.



या प्रकारात बिटकॉईन विक्रीवेळी खरेदीचा खर्च 'शून्य' मानला जातो.

जर एखाद्या व्यक्तीने बिटकॉईन गुंतवणूक म्हणून खरेदी करून नंतर त्याची विक्री केली, तर तो व्यवहार भांडवली नफा म्हणून करपात्र ठरतो.

**उदाहरणार्थ :**

- दहा बिटकॉईन खरेदीसाठी खर्च : ९१५ लाख रुपये
- विक्रीची किंमत : ८९८.५ लाख रुपये
- एकूण नफा : ११६.५ लाख रुपये
- कर : तीस टक्के दराने

जेव्हा एखादी व्यक्ती बिटकॉईनचा व्यापार करते म्हणजे खरेदी करून वाढीव किमतीला विकते, तेव्हा हा व्यवसाय उत्पन्न म्हणून गणला जातो. यावर पुन्हा ३० टक्के दरानेच कर आकारला जातो. यामध्येही इतर कोणताही खर्च वजावटीस पात्र नसतो.

- क्रिप्टो व्यवहार करताना प्रत्येक व्यवहाराची तारखेनिहाय नोंद ठेवा
- विक्रीवेळी प्राप्त रक्कम, त्याचा फेअर मार्केट मूल्य आणि खरेदी खर्च नीट नोंदवा
- कर सल्लागाराचा सल्ला घ्या
- टीडीएस कपात व भरणा वेळेवर करा

एखाद्याने आपल्या सेवांचा मोबदला बिटकॉईनमध्ये घेतला, तर त्या वेळचे बाजारमूल्य (फेअर मार्केट व्हॅल्यू) त्याचे व्यवसाय उत्पन्न मानले जाते. उदाहरणार्थ, एका स्वतंत्र व्यावसायिकाने ग्राहकाला १० लाख रुपयांची सेवा पुरवली आणि ग्राहकाने ०.२ बिटकॉईन पाठवले, ज्याची किंमत त्यावेळी दहा लाख रुपये होती. नंतर हे बिटकॉईन विकल्यावर ११ लाख रुपये मिळाले असतील तर यामध्ये ११ लाख रुपये करपात्र रक्कम मानली जाते.

एकूणच, बिटकॉईन व इतर क्रिप्टोचलनांची भारतातील करप्रणाली सध्या अत्यंत कठोर आहे. सरकारने स्पष्टपणे ३० टक्के करदर लागू करून, कोणत्याही वजावट अथवा तोट्याचा विचार न करण्याची भूमिका घेतली आहे. अशा परिस्थितीत गुंतवणूकदारांनी किंवा व्यापाऱ्यांनी या व्यवहारांसाठी स्वतंत्र लेखांकन ठेवणे आणि कर नियमांचे पूर्ण पालन करणे आवश्यक आहे.

## विमा कवच किती हवे?

भारतातील अनेक नागरिक अजूनही विमा खरेदी ही केवळ कर वाचवण्यासाठी, बँकेच्या अटी पूर्ण करण्यासाठी किंवा केवळ औपचारिकता म्हणून करतात. विम्याचे खरे स्वरूप म्हणजे आर्थिक धोका टाळणे ह ही गोष्ट दुर्लक्षितच राहते. खरे पाहता भारतात वैद्यकीय महागाई झपाट्याने वाढत आहे. टियर-वन शहरांमधील खासगी रुग्णालयांत एक दिवसाचा आयसीयूमधील राहणीखर्च पन्नास हजारांपासून तीन लाख रुपयांपर्यंत जातो. अशा वेळी एका पाच लाखांच्या आरोग्य विमा पॉलिसीवर विश्वास ठेवणे म्हणजे स्वतःला धोका पत्करणेच होय.



अनेक विमाधारक केवळ किमान प्रीमियम असलेली योजना घेतात आणि स्वतःला सुरक्षित समजतात. पण जेव्हा प्रत्यक्षात संकट येते, तेव्हा तो विमा अपुराच ठरतो.

एका व्यक्तीची पाच लाखांची आरोग्य विमा पॉलिसी होती. पण उपचारासाठी रुग्णालयाचा एकूण खर्च १७ लाख रुपये झाला. उरलेले बारा लाख रुपये कुटुंबाला स्वतःच्या खिशातून भरावे लागले आणि तेही वैयक्तिक कर्ज घेऊन. अशा घटना सध्या अपवाद राहिलेल्या नाहीत.

आजही विमा एजंट्स किंवा जाहिराती कर वाचवण्याचे फायदे, गुंतवणूक-सह-विमा योजना याच गोष्टी अधोरेखित करतात. वास्तविक, आजच्या वैद्यकीय जगात, एक आजार तुमचं सर्व आयुष्याचं बचत खातं रिकामं करू शकतो. अशा वेळी नोकरीवर मिळणाऱ्या विम्यावर अवलंबून राहणेही धोकादायक काही लोकांना वाटते की कंपनीकडून मिळणारा विमा पुरेसा आहे. पण बहुतांश कंपन्यांच्या पॉलिसीज केवळ तीन ते पाच लाख रुपयांपर्यंतच्या आहेत आणि मोठ्या आजारांमध्ये हे कव्हर क्षणात संपते. कॅन्सर, हृदयशस्त्रक्रिया, लांब काळासाठी आयसीयू राहणीहे सर्व खर्च लाखोंमध्ये जातात.

**उपाय काय?**

टॉप-अप योजना घ्या : मूळ आरोग्य विमा योजना (दहा ते पंधरा लाखांची) घ्या आणि त्यावर २० ते ५० लाखांची अतिरिक्त टॉप-अप योजना घ्या.

पॉलिसी काळजीपूर्वक वाचा : कोणते आजार आणि उपचार वगळण्यात आले आहेत, हे समजून घ्या.

प्रीमियम नव्हे, कव्हरेज महत्त्वाचे : कमी प्रीमियमच्या मागे न लागता, भरपूर कव्हरेज देणारी योजना निवडा.

आपण विमा हा एक आर्थिक सुरक्षा कवच म्हणून पाहायला हवा. फक्त कर वाचवण्यासाठी किंवा गुंतवणुकीच्या संधी म्हणून त्याचा विचार चुकीचा आहे. विमा हे धोका व्यवस्थापनाचे माध्यम आहे ह जिथे संकटाच्या वेळी कंपनीकडून मिळणारी भरपाई महत्त्वाची ठरते, प्रीमियम नव्हे.

## कर्जामधलं चांगलं-वाईट

आजच्या आर्थिक जगात 'कर्ज' या शब्दाकडे अनेकदा संकोचाने पाहिले जाते. अनेक लोकांना वाटते की कर्ज घेणे म्हणजे आर्थिक विवंचनेत अडकणे. पूर्वीच्या काळातील सावकारी पद्धती आणि वाढलेल्या व्याजदरामुळे समाजात अशी धारणा तयार झाली की कर्ज हे केवळ संकटात सापडलेल्या व्यक्तींसाठी असते. परंतु वास्तव वेगळे आहे. प्रत्येक कर्ज हे वाईटच असते असे नाही. काही कर्ज प्रकार हे आपल्या भविष्यासाठी उपयुक्त गुंतवणूक ठरू शकतात. तर काही कर्ज आर्थिक बोजा आणि मानसिक तणाव निर्माण करणारे असतात. त्यामुळेच 'चांगले कर्ज' आणि 'वाईट कर्ज' यातला फरक समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

**चांगले कर्ज म्हणजे काय?**

▶ चांगले कर्ज हे आपण संपत्ती निर्माण करण्यासाठी किंवा कौशल्यवृद्धीसाठी घेतो. अशा कर्जाचा उपयोग दीर्घकालीन लाभ देणाऱ्या गोष्टींसाठी होतो. याचे बाजारमूल्य वाढू शकते किंवा ते नियमित उत्पन्नाचे साधन बनू शकते.

▶ उदाहरणार्थ शैक्षणिक कर्जाच्या साहाय्याने आपण उच्च शिक्षण घेऊ शकतो, जे भविष्यात चांगल्या करिअर आणि अधिक उत्पन्नाचे दरवाजे उघडते. घर किंवा फ्लॅट खरेदी करण्यासाठी घेतलेले कर्ज हे रिअल इस्टेटमध्ये गुंतवणुकीचे माध्यम बनते. वेळेनुसार त्याचा बाजारमूल्य वाढत जाते.

नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा अस्तित्वात असलेल्या व्यवसायाचे विस्तार करण्यासाठी घेतलेले कर्ज भविष्यात नफा मिळवून देणारे ठरते. या कर्जांची वैशिष्टे म्हणजे कमी व्याजदर, कर सवलती, क्रेडिट स्कोअर सुधारण्यासाठी उपयुक्त, नियोजनबद्ध परतफेड केल्यास विश्वासार्हता निर्माण होते.

**वाईट कर्ज म्हणजे काय?**

▶ आता प्रश्न पडेल की मग वाईट कर्ज म्हणजे काय? हे कर्ज तात्पुरत्या हव्यासासाठी घेतले जाते. या कर्जातून कोणतीही भौतिक किंवा आर्थिक संपत्ती निर्माण केली जात नाही. यामध्ये खरेदी केलेल्या वस्तूंची किंमत लवकरच घटते किंवा त्या दीर्घकालीन उत्पन्नाचे स्रोत बनत नाहीत.

▶ उदाहरणार्थ, क्रेडिट कार्डवरून नको असलेली वस्तू खरेदी करणे

▶ फिरण्यासाठी किंवा लक्झरीसाठी घेतलेले वैयक्तिक कर्ज

▶ ज्या वाहनांची किंमत लवकरच घसरते, त्यासाठी घेतलेले कर्ज

▶ या कर्जांची वैशिष्टे पाहिल्यास उच्च व्याजदर, परतफेड न केल्यास व्याज वाढून चढत जाणारा बोजा, क्रेडिट स्कोअरवर नकारात्मक परिणाम, उत्पन्नात कोणताही भर न पडणारे खर्च ही आहेत.

**कर्ज घेताना काय काळजी घ्यावी?**

- परतफेडीची क्षमता ओळखा. फक्त गरजेइतकेच कर्ज घ्या.
- व्याजदर, शुल्क आणि अटी समजून घ्या. लपवलेले शुल्क टाळा
- प्रत्येक आकर्षक ऑफर ही गरज नसते. हव्यास आणि गरज यामधील फरक ओळखा.
- क्रेडिट मर्यादेचा संपूर्ण वापर टाळा. क्रेडिट कार्डच्या ३० ते ४० टक्के इतकाच वापर करावा. वापर श्रेयस्कर
- वेळीच हप्ते भरून कर्जाची परतफेड केल्याने क्रेडिट स्कोअर सुधारतो

▶ योग्य नियोजनाने आणि गरजेनुसार घेतलेले कर्ज हे केवळ संपत्ती निर्मितीसच मदत करत नाही तर आपली क्रेडिट हिस्ट्रीही सुधारतो. कर्जाची खरी किंमत ती परतफेडीच्या क्षमतेवर आणि उद्देशावर अवलंबून असते. उदाहरणार्थ घरखरेदीसाठी घेतलेले कर्ज भाड्याच्या तुलनेत फायदेशीर ठरते. व्यवसायासाठी घेतलेले कर्ज उत्पन्नाचा स्रोत निर्माण करते. कर्ज ही आधुनिक आर्थिक व्यवस्थेतील एक अपरिहार्य गोष्ट आहे. पण कर्ज चांगले आहे की वाईट, हे पूर्णपणे त्याच्या वापराच्या उद्देशावर आणि परतफेडीच्या नियोजनावर अवलंबून असते. शहाणपणाने आणि माहितीच्या आधारे घेतलेले कर्ज भविष्यात आर्थिक समृद्धीचा मार्ग मोकळा करते, तर न विचारता घेतलेले कर्ज आर्थिक अडचणी वाढवू शकते.



## गोल्ड ईटीएफमधील गुंतवणूक पाच महिन्याच्या उच्चांकावर

विविध देशांदरम्यान चालू असलेले युद्ध, अमेरिकेने सुरू केलेले व्यापार युद्ध आणि शेअर बाजारातील अस्थिरता या कारणामुळे सोन्यातील गुंतवणूक आकर्षक झाली आहे. अशा परिस्थितीत गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंड म्हणजे गोल्ड ईटीएफमधील गुंतवणूक जून महिन्यात वाढून २,०८१ कोटी रुपये इतकी झाली आहे.





गेल्या पाच महिन्यांमध्ये या क्षेत्रात एवढी गुंतवणूक प्रथमच झाली आहे. मे महिन्यामध्ये या क्षेत्रात केवळ २९२ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती. तर एप्रिल महिन्यात या क्षेत्रात गुंतवणूक होण्याऐवजी सहा कोटी रुपये काढून घेण्यात आले होते. मार्च महिन्यामध्ये ७७ कोटी रुपये काढून घेण्यात आले होते.

ही माहिती असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड्स इन इंडिया या संस्थेने जारी केले आहे. जानेवारी ते जून या कालावधीत गोल्ड ईटीएफमध्ये झालेले गुंतवणूक आता ८ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त झाली आहे. मे महिन्यापर्यंत गोल्ड एटीएम अंतर्गत झालेली एकूण गुंतवणूक ६२, ४५३ कोटी रुपये होती. ती वाढून जून महिन्यात ६४,७७७ कोटी रुपये इतकी झाली आहे.

मॉर्निंग स्टार इन्व्हेस्टमेंट रिसर्च इंडिया या संस्थेच्या वरिष्ठ विश्लेषक नेहल मेश्राम यांनी सांगितले की, आता गोल्ड ईटीएफ पर्यायी गुंतवणूक साधन म्हणून भारतामध्ये लोकप्रिय होऊ लागले आहे. सोन्याच्या किमती वाढत आहेत आणि वाढत राहण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत या क्षेत्रात केलली गुंतवणूक अधिक सुरक्षित आणि अधिक परतावा देणारी ठरेल असे गुंतवणूकदारांना वाटत आहे. जून महिन्यात गोल्ड ईटीएफ खात्यांची संख्या २.७५ लाखांनी वाढून ७६.५४ लाख झाली आहे.

## टीसीएसचा महसूल अपेक्षेपेक्षा कमी

भारतातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सर्वात मोठी कंपनी असलेल्या टीसीएस कंपनीने गुरुवारी सुमार ताळेबंद जाहीर केला. पहिल्या तिमाहीत टीसीएसचा महसूल केवळ १.३ टक्क्यांनी वाढून ६३,४३७ कोटी रुपये इतका झाला आहे . विश्लेषकांना हा महसूल ६४,६६६ कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची अपेक्षा होती. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी के कृतीवसन यांनी सांगितले की, जागतिक पातळीवर अस्थिरता असल्यामुळे काही प्रमाणात परिणाम झाला आहे.

कंपनीचा नफा ६ टक्क्यांनी वाढून १२,७६० कोटी रुपये इतका झाला आहे. कंपनीने ११टक्के अंतरिम लाभांश जाहीर केला अजून हा लाभांश चार ऑगस्ट रोजी वितरित केला जाणार आहे. कंपनीकडून सांगण्यात आले की, जागतिक परिस्थिती खराब असली तरी कंपनीने उत्तम कामगिरी केली आहे. जुन्या ग्राहकांना सेवा कार्यक्षमरीत्या दिली जात असून नवे ग्राहक मिळत आहेत. नव्या तंत्रज्ञानावर आधारित कंपनीच्या सेवा ग्राहकांना पसंत पडत आहेत. एप्रिल- जून या तिमाहीत कंपनीने नव्या ६,०७१ कर्मचाऱ्यांना कामावर घेतले.

असे असूनही कंपनीच्या शेअरचा भाव साडेतीन टक्क्यांनी कोसळून ३,२६४ रुपये प्रति शेअर या पातळीवर गेला. अर्थात केवळ टीसीएसचाच शेअर घसरला नाही तर माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील विप्रो, एचसीएल टेक, महिंद्रा या कंपन्यांनाही विक्रीचा मारा सहन करावा लागला. भारतातील सॉफ्टवेअरची निर्यात अमेरिकेला मोठ्या प्रमाणात केली जाते. अमेरिकेचे अस्थिर धोरण त्याचबरोबर तेथिल अर्थव्यवस्था कमकुवत होण्याच्या शक्यतेमुळे भारतातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचे काम कमी होईल असे गुंतवणूकदारांना वाटत आहे. त्यामुळे गुंतवणूकदार माहिती तंत्रज्ञान कंपन्यांच्या शेअरची विक्री करीत असल्याचे वातावरण सध्या आहे. बजाज ब्रोकिंग रिसर्च या कंपनीने यासंदर्भात म्हटले आहे की, टीसीएसचा महसूल कमी झाला असतानाच आगामी काळातही जास्त महसुलाची अपेक्षा करता येणार नाही असे कंपनीच्या व्यवस्थापनाने सुचित केले आहे. अशा परिस्थितीत गुंतवणूकदार विक्री करीत आहेत.

